रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १४२ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५
किंमत ४ ₹

## सुलभ शौचालयात मतदार नोंदणी

**नवी मुंबई :** बेलापूर विधानसभा मतदारसंघात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जुईनगर येथील सेक्टर २३ मधील नवी मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक सुलभ शौचालयाच्या पत्त्यावर चक्क एका व्यक्तीची मतदार म्हणून नोंदणी झाल्याने सर्वत्र चर्चांना उधाण आले आहे. या प्रकारामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर सर्व स्तरातून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे गेल्या काही वर्षांपासून लांबणीवर गेल्या होत्या. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश दिल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार पान २ वर

## एसटीला करोडोंचे उत्पन्न

**मुंबई :** दिवाळी हंगामात राज्य परिवहन एसटीला तब्बल ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने मिळवले आहे. १८ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर या दिवाळीच्या १० दिवसात एसटी महामंडळाला दररोज सरासरी ३० कोटी याप्रमाणे तब्बल ३०१ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. विशेष म्हणजे दिवाळी सुट्टीच्या परतीच्या दिवशी २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळवून या वर्षातील सर्वाधिक उत्पन्नाचा नवा विक्रम केला आहे. एसटीच्या ३१ विभागात सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने आणले असून ते २० कोटी ४७ लाख रुपये आहे. त्याखालोखाल धुळे विभागाने १५ कोटी ६० लाख रुपयांचा महसूल गोळा केला आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर लाल वादळाची धडक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यात २६ ते २८ सप्टेंबर, २१ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत अवकाळी पाऊस पडला. या पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले आहे. भातशेतीसह नारळ, सुपारी आदी पिकांचे या पावसात प्रचंड नुकसान झाले. हातातोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मात्र शासनाकडून त्याची दखल घेतली जात नाही. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शेतकरी कामगार पक्षाचे लाल वादळ अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवारी (दि.२९) दुपारी धडकले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेतली. सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्या, अशी मागणी यावेळी शेकापच्या वतीने करण्यात आली. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

- सरसकट नुकसान भरपाई द्या
- शेतकरी कामगार पक्षाची सरकारकडे मागणी
- जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे निवेदन



यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस अ‍ॅड. गौतम पाटील, राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल शांताराम पाटील, अ‍ॅड. परेश देशमुख, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, शेतकरी सभा तालुका अध्यक्ष अनिल पाटील, अ‍ॅड. निलम हजारे, आदी पदाधिकारी, पान २ वर

## वेधक

### धमकी देत मुलीवर अत्याचार

**अलिबाग :** फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना अलिबाग शहर परिसरात समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे गेली दीड वर्षे या मुलीवर अत्याचार सुरू होता. याप्रकरणी अलिबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.पीडित अल्पवयीन मुलीचा तिच्या मित्रासोबतचा फोटो या आरोपी तरूणाच्या हाती लागला. हा फोटो तिच्या कुटुंबियांना दाखवण्याची आणि व्हायरल करण्याची धमकी देत या तरूणाने तिला ब्लॅकमेल करण्यास सुरूवात केली. हा फोटो तुझ्या कुटुंबियांना दाखवतो, व्हायरल करतो असे तो तिला धमकावत असे. या तरूणाने पीडित पान २ वर

### मंदिरातील पुजाऱ्याची आत्महत्या

**नागोठणे :** नागोठण्यातील जैन मंदिरातील पुजाऱ्याने आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी (दि.२८) दुपारी ३.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. नागोठणे बाजार पेठेतील आराधना भवन या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील खोली क्रमांक ३ मध्ये बेडशीटच्या सहाय्याने सीलिंग फॅनला गळफास घेऊन मयुरकुमार महेशभाई राठवा (वय २३) नावाच्या पुजाऱ्याने आपली जीवनयात्रा संपविली. नागोठण्यातील जैन मंदिरातील मुख्य पुजारी काही दिवसांपूर्वी गावी गेल्याने सध्या त्याच्या जागी तात्पुरत्या स्वरूपात बदली पुजारी म्हणून साधारणतः पंधरा दिवसांपूर्वी हा पान २ वर

### खारघरमधील इमारतीला आग

**पनवेल :** खारघर शहरातील सेक्टर ७ मधील रावेची हाइट्स या निवासी इमारतीत बुधवारी दुपारी आगीची लागल्याची घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार, दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये ही आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीच्या चित्रीकरणाच्या अंदाजावरुन येवढ्या मोठ्या प्रमाणात घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास फ्लॅटमधून अचानक धुराचे लोट बाहेर येताना पाहून इमारतीतील रहिवाशांनी तात्काळ पोलिसांना व अग्निशामक दलाला याबाबत कळवले आहे.

### महिला डॉक्टर प्रकरणी बदने कचाट्यात

**फलटण :** फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात दिवसभरात वेगवेगळी माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रशांत बनकर आणि पीएसआय गोपाल बदने पोलीस कोठडीत आहेत. पोलीस त्यांची कसून चौकशी करत आहे. पण आता आरोपी पीएसआय गोपाल बनकरच्या अडचणीत वाढ झाल्याचे समोर आले आहे. महिला डॉक्टरने आत्महत्या करण्यापूर्वी गोपाल बनकर आणि प्रशांत बनकर या दोघांवर मानसिक व शारिरीक छळाचा आरोप केला. तिने याबाबत हातावर नोट लिहिली. डॉक्टरच्या आत्महत्येनंतर पोलिसांनी तातडीने प्रशांत बनकरच्या घरी जाऊन त्याला अटक केली. त्यानंतर गोपाल बदने हा दोन दिवस फरार होता.

# कार्यकर्त्यांनी कामाला लागा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष हा सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेवून काम करणारा पक्ष आहे. गोरगरींबाशी आपली नाळ जोडली गेली आहे. येथील शेतकरी, कष्टकरी, कामगार, वंचित घटक जगला पाहिजे, यासाठी आपण काम करीत आहोत. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदांच्या निवडणूका होणार आहे. कोणत्याही अफवांना बळी न पडता, एक दिलाने प्रत्येकाने या निवडणूकांमध्ये कामाला लागा. घरोघरी जाऊन पक्षाची ध्येय-धोरणे प्रत्येक मतदारांना समजवावून सांगा. आगामी निवडणुकीत विजय हा आपलाच आहे, असे प्रतिपादन शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबागधील शेतकरी भवन येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या.

- शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचे आवाहन

यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस अ‍ॅड. गौतम पाटील, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप तालुका चिटणीस पान २ वर




### निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हा -अ‍ॅड.मानसी म्हात्रे

गेली काही वर्षापासून नगरपरिषदेसह जिल्हा परिषद पंचायत समितीवर प्रशासकीय राजवट आहे. शहरासह तालुक्यांमधील गटार, पाणी, रस्ते असे अनेक प्रश्न सोडविण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाने केले आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष यांच्या माध्यमातून प्रश्न मार्गीदेखील लावण्यात आले आहेत. शेतकरी कामगार पक्ष जनसामान्यांसाठी उभा राहत आहे. हेच ध्येय ठेवून आगामी निवडणुकांना सामोरे जायचे आहे. व्यापक स्वरुपात बैठक घेऊन काम केले जाणार आहे. अलिबाग शहरातील पुढील निवडणूक प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनातून, त्यांच्या विचारातून लढविली जाणार आहे. आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याची ताकद दाखविण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकाप महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी केले.




# राजाभाईंचा ‘कार’नामा

- शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाध्यक्षांच्या गाडीवर आमदाराचा लोगो; नागरिकांकडून कारवाईची मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा शिवसेना शिंदे गटाच्या अध्यक्षांचा एक मकारफ्नामा चर्चेचा विषय बनला आहे. आमदार नसतानाही त्यांनी आपल्या गाडीवर ‘आमदार’ असा लोगो लावला असल्याचे समोर आले आहे. राजा केणी असे या जिल्हाध्यक्षांचे नाव असून, त्यांच्या या कृत्यामुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

राजा केणी यांची डिफेंडर युके ०७ एचसी १२३४ गाडी संपूर्ण जिल्ह्यात आमदारांचा लोगो लावून राजरोसपणे फिरत आहे. मोटार वाहन कायद्यानुसार गाडीवर लोगो लावणे चुकीचे असताना शिंदे गटाचे रायगड जिल्हा प्रमुख राजा केणी यांच्या गाडीवर आमदारांचा लोगो असल्याचे दिसून आले आहे. लोगो लावण्यास परवानगी नसताना ते बेकायदेशीररित्या या लोगोचा वापर करीत मिरवत आहेत. त्यामुळे आयजीच्या जीवावर बायजी उदार अशी अवस्था पान २ वर

> जिल्ह्यात बेकायदेशीरित्या गाडीवर लोगो लावणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ही कारवाई सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी विनाकारण कोणताही लोगो लावू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.
>
> – भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा

### नियम काय सांगतात?

महाराष्ट्रात विधानसभेतील २८८ सदस्य आणि विधान परिषदेतील ७८ सदस्यांनाच शासकीय कामासाठी त्यांच्या गाडीवर ‘आमदार’ असा लोगो लावण्याचा अधिकार आहे. हा अधिकार फक्त अधिकृत आमदार आणि विधान परिषदेच्या सदस्यांनाच असतो. मात्र, राजा केणी हे आमदार नसतानाही त्यांनी हा लोगो वापरला, ज्यामुळे त्यांच्यावर टीका होत आहे. केणी यांनी स्वतःच गाडीवर हा लोगो लावून आपण आमदार झाल्यासारखे वागत आहेत, अशी टिप्पणी आता जिल्ह्यात सुरू आहे. या प्रकरणामुळे शिंदे गट आणि त्यांच्या नेत्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. विधानसभा सदस्य अर्थात आमदार असलेल्या व्यक्तीला आपल्या वाहनावर त्यांच्या पदाचा उल्लेख असलेले स्टिकर लावण्याची मुभा आहे. मात्र, असे स्टिकर केवळ विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असतानाच पान २ वर

# किनेश्वर धरणाचे काम रखडले

**। पोलादपूर । शैलेश पालकर ।**




२००९ मध्ये किनेश्वर लघुपाटबंधारे योजनेला औरंगाबाद महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने २००९-१० मध्ये ७ कोटी ६४ लाख ५० हजार ८२६ रूपये खर्च करण्यास प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी धरणाच्या भूमिपूजनाचा नारळ फोडण्यात आला.

मात्र, भूसंपादनाच्या मोबदल्यास किनेश्वर आणि कापडे खुर्दचे शेतकरी वंचित असताना याच परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी कमाल जमिनधारणा कायद्यातील निर्बंधांकडे दुर्लक्ष करून खासगीरित्या खरेदी करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. अवजड वाहनांच्या ये-जा करण्याने खराब झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण व कोसळलेल्या पुलाची उभारणी राज्य सरकारच्या तिजोरीतून करूनही संबंधित ठेकेदाराने या धरणाच्या कामाकडे सपशेल दुर्लक्ष केल्याने धरणाचे काम गेल्या ७ वर्षांपासून रखडले आहे. पान २ वर

- कापडे खुर्द व किनेश्वरचे शेतकरी भूसंपादनाच्या मोबदल्यास वंचित
- कमाल जमीनधारणा कायद्याकडे दुर्लक्ष करून खरेदी

(उत्तरार्ध उद्याच्या अंकात)

### दुचाकी अपघातात चिमुकल्याचा मृत्यू

**वावोशी :** खालापुर तालुक्यातील डोणवत गावाच्या हद्दीत रविवारी सकाळी अपघात घडला. आईच्या ओढणीचे टोक मोटारसायकलच्या टायरमध्ये अडकल्याने मोटारसायकल घसरली आणि या भीषण अपघातात ३ वर्षांचा बालक प्रियांश सागर वाघमारे याचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहिदास हिलम यांचे मेव्हणे सागर सुरेश वाघमारे हे बहीण पिंकी व प्रियांश यांना घेऊन इसांबेवाडी येथे घरी परतत होते. बहिणीच्या ओढणीचे टोक मोटारसायकलच्या मागील टायरमध्ये अडकल्याने मोटारसायकल घसरली. त्यात तिघेही खाली पडले आणि प्रियांशच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो जागीच मृत्यू पावला.

# मासेमारी बोटी बेपत्ता!

- कोस्टगार्डकडून शोधमोहीम सुरू
- आयुक्त किशोर तावडे यांची माहिती

**। उरण । प्रतिनिधी ।**

खवळलेल्या समुद्रात खोलवर गेलेल्या मासेमारी बोटींपैकी काही बोटी अजूनही बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय कोस्टगार्डकडून शोधमोहीम सुरू असल्याची माहिती मत्स्यविभाग आयुक्त किशोर तावडे यांनी दिली आहे.

तथापि, खलाशी मात्र आजही अनेक बोटी बेपत्ता असल्याचं सांगत आहेत. त्यांचा आरोप असा की बोटी जनरेटर व एलईडी लावून बेकायदेशीर मासेमारी करत होत्या. त्याला अधिकाऱ्यांचा आशीर्वाद होता. त्यामुळे आता आपलं बिंग फुटू नये म्हणूनच अधिकारी माहिती लपवत आहेत, असा आरोप खलाशी वर्ग करीत आहे.



नारळी पौर्णिमेनंतर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मासेमारी हंगामाची सुरुवात झाली असली, तरी कमी दाबाचा पट्टा, प्रचंड वारे आणि उंच लाटा यामुळे समुद्र प्रचंड खवळला आहे. त्यामुळे मोरा व करंजा बंदरावर गुजरातसह शेकडो बोटी उभ्या करण्यात आल्या आहेत. तरी काही बोटी समुद्रात गेल्या. आता त्यांचा थांगपत्ता लागत नाही.

खलाशी वर्ग सांगतो, अशी भयानक परिस्थिती आम्ही कधीच पाहिली नव्हती. तीन-चार वेळा समुद्र खवळल्याने बोटी उभ्या केल्या, पण खोल समुद्रात गेलेल्या बोटींचं काहीही चिन्ह दिसत नाही. या पार्श्वभूमीवर बेपत्ता बोटींचा शोध सुरू असून, समुद्रकिनाऱ्यालगत तातडीने शोधमोहीम राबवली जात आहे. बेपत्ता बोटींतील खलाशांचा शोध तातडीने घेण्यात यावा आणि त्यांच्या कुटुंबांना पान २ वर

### ६ डझनांच्या पेटीला तब्बल २५ हजार रुपये | प्रकाश शिर्सेकरांच्या आंब्याने खाल्ला भाव

# वाशी बाजारात देवगडच्या हापूसची दिवाळी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर वाशीच्या मुंबई एपीएमसी फळ बाजारात दाखल झालेल्या हापूस आंब्याला विक्रमी दर मिळाला आहे. देवगडवरून आलेल्या हापूस आंब्याच्या ६ डझनांच्या पेटीला तब्बल २५ हजार रुपयांचा भाव मिळाला असून, आजपर्यंत मिळालेल्या दरांपैकी हा दर सर्वाधिक मानला जात आहे.

वाशीतील मुंबई एपीएमसी फळ बाजारात यंदा देवगड तालुक्यातील पडवणे गावचे बागायतदार प्रकाश धोंडू शिर्सेकर यांनी ऑक्टोबर महिन्यात दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर हापूस आंब्याची ६ डझनाची पेटी



पाठवली होती. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात कोकणातील हापूस आंबा एपीएमसी बाजारात दाखल होतो; मात्र यंदा ऑक्टोबर महिन्यातच तेही दिवाळीच्या मुहूर्तावर मुंबई एपीएमसी फळ बाजारात कोकणातील हापूस दाखल होणे ही एपीएमसीच्या इतिहासातील पहिलीच घटना ठरली.

यावेळी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नानाभाऊ जेजूरकर अँड कंपनी या व्यापाऱ्यांकडे ही पेटी दाखल झाली होती. त्या दिवशी या पेटीची विधिवत पूजा करण्यात आली आणि आंबे पूर्णपणे पिकल्यानंतर विक्रीसाठी ठेवण्यात येतील, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली होती. त्यानंतर काही दिवसांनी बोली लावण्यात आली असता, या मुहूर्ताच्या आंब्याच्या पेटीला तब्बल २५ हजारांचा विक्रमी दर मिळाल्याचे व्यापारी हर्षल जेजुरकर यांनी सांगितले. मुंबईतील एका ग्राहकाने ही पेटी खरेदी केली असून, त्याचे नाव व्यापाऱ्यांनी गोपनीय ठेवले आहे. आतापर्यंत हापूस आंब्याच्या पेटीला २० ते २२ हजारांपर्यंत विक्रमी दर मिळाला होता. परंतु, यंदा लक्ष्मी पूजनाच्या शुभ मुहूर्तावर आलेल्या हापूसच्या पेटीला २५ हजारांचा दर मिळाल्याने सर्वांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.शिर्सेकर यांच्या बागेत जुलै महिन्यातच काही कलमांना आगाऊ मोहोर आला होता. त्या कलमांवर त्यांनी विशेष प्लास्टिक आवरण व फवारणी करून फळधारणा टिकवली. त्यातून तयार झालेल्या आंब्यांपैकी पहिली पेटी दिवाळीपूर्वीच बाजारात पोहोचली. यंदा आंबा हंगामाला अद्याप सुरुवात झाली नसती तरी मुहूर्ताच्या हापूस पेटीला मिळालेल्या या विक्रमी दरामुळे आंबा बागायतदार शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# अंगणवाड्यांमध्ये मिळणार स्मार्ट शिक्षण

### रायगडातील ३१५ अंगणवाडी केंद्रांना मंजूरी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ‘स्मार्टअंगणवाडीकिट’ खरेदीस राज्य शासनाने लललान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ३१५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये करण्यात येणार आहे.



या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास पान २ वर

पान १ वरून

## लाल वादळाची धडक

विविध आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य, महिला, तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुरुवातीपासूनच पावसाचा फटका बसला आहे. परतीच्या पावसाने शेतांमध्ये पाणी साचले. कापणीयोग्य झालेली भात पिके पाण्याखाली गेली. कापणी केलेली पिके पाण्यात वाहून गेली. वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे भातपीक, सुपारी बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पावसामुळे पूर्ण तयार झालेले भातपीक पाण्यात आडवे पडून कणसे मोडली असून, अनेक शेतकऱ्यांच्या कापणीस ठेवलेल्या भाताच्या पिकांना कोंब येऊ लागले आहेत. रायगड जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यातील बहुतांश शेतकरी वर्षातून एकदाच भाताचे उत्पादन घेतात. या पिकाच्या नुकसानीमुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. चौल, रेवदंडा, नागाव परिसरातील सुपारी उत्पादकांचेही मोठे नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शासनाने तात्काळ सरसकट पंचनामे करून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील इतर भागातील भात, सुपारी, आंबा व इतर पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.यावर्षी भात विक्री केंद्र अद्याप करण्यात आले नाही. भाताचा ठरविण्यात आलेला भाव फारच कमी आहे. त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी शेकापचे लाल वादळ धडकले.शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी शेकापच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेतली. त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडण्यात आले. सरसकट पंचनामे करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी दिल्याची माहिती शेकाप शेतकरी सभा तालुका अध्यक्ष अनिल पाटील यांनी दिली.

## कार्यकर्त्यांनी कामाला लागा

सुरेश घरत, शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल पाटील, ॲड. सचिन जोशी, अशोक प्रधान, ॲड. परेश देशमुख, ॲड. निलम हजारे, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे आदी पदाधिकारी, तसेच वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, सदस्य उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, अलिबागसह रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते चांगल्या पध्दतीने काम करीत असल्याचा आनंद आहे. स्मार्ट मीटर, भरमसाठ वीजबील, रस्त्यांवरील खड्डे अशा अनेक प्रश्नांवर शेतकरी कामगार पक्षाने आवाज उठविला आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी शेतकरी कामगार पक्षच रस्त्यावर उतरू शकतो. हे अनेकवेळा वेगवेगळ्या लढ्यातून कार्यकर्त्यांनी दाखवून दिले आहे. शेतकरी कामगार पक्षाची बांधिलकी गरीबांशी आहे. संघटना म्हणून जोमाने काम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थावर आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी कामाला लागा. शहरी भागासह ग्रामीण भागातील वेगवेगळ्या आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन आगामी निवडणुकीतील ध्येय-धोरणे स्पष्ट केले जाणार आहेत. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार ही कामे चालू राहणार आहेत. निवडणुका जाहीर झाल्याशिवाय उमेदवार जाहीर केला जाणार नाही. मात्र जनतेशी बांधीलकी असणारे, शेवटच्या घटकांपर्यंत पोहचून काम करणारे उमेदवारच जाहीर केले जाणार आहेत, असे शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी सांगितले. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**शेकाप एक नंबरचा पक्ष राहिला पाहिजे -ॲड. गौतम पाटील**

कोरोना काळात शेतकरी कामगार पक्षानेच काम केले. नऊ वर्षांने निवडणूकांना सोमारे जाताना याबाबतच आढावा घेणे आवश्यक आहे. विरोधकांनी काहीच काम केले नाही. रस्ते, पाणी देण्याचे काम आमदारांचे आहे, मात्र हे प्रश्न आजही कायम आहेत. मात्र शेतकरी कामगार पक्षाने रस्ते, पाणी आदी प्रश्नांची सोडवणूक केली आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचा प्रतिनिधी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत निवडून आला पाहिजे. त्या पध्दतीने प्रत्येकाने काम करायचे आहे. शेकाप जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष राहिल या पध्दतीने काम करण्याकडे लक्ष द्या, असे प्रतिपादन शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी केले.

## राजाभाईंचा 'कार'नामा

झाल्याची चर्चा आहे. राजा केणी राष्ट्रवादीत जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तूळात सुरु असताना, आता राजा केणी यांच्या गाडीवरील लोगोबाबत वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला उधाण आले आहे. शिंदे गटाचे महेंद्र दळवी हे आमदार आहेत. त्यांच्या पदाचा आधार घेत राजा केणी आपल्या गाडीवर आमदार लोगो लावून मिरवत आहेत. आमदार म्हणून त्यांचा दुरपर्यंत संबंध नसताना त्यांच्या गाडीवर आमदार लोगो लावण्यात आला आहे. मोटार वाहन कायद्यानुसार आमदारांचे लोगो लावणे बेकायदेशीर आहे. तरीदेखील राजा केणींनी नियमांचे उल्लंघन करीत गाडीवर आमदारांचा लोगो लावला.

रायगड वाहतूक पोलिसांनी या लोगोबाबत कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. मागील अनेक दिवसांपासून कारवाईचे सत्र सुरु करण्यात आले आहे. विनाकारण आमदारांचे लोगो लावणाऱ्यांविरोधात वाहतूक पोलीस कारवाई करीत असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरु झालेल्या या कारवाईतून अनेकांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता या मोहिमेत केणींवर कारवाई होणार का, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

**नियम काय सांगतात?**

लावता येतो. तसेच असे स्टिकर लावण्यात आलेल्या वाहनाची संबंधित आमदाराच्या नावाने आरटीओ दफ्तरी नोंद असणेही आवश्यक आहे. तसे नसल्यास तो कायदेभंग ठरू शकतो. मात्र, स्वतःला आमदार समजणाऱ्या केणींची संपूर्ण जिल्ह्यात डिफेंडर (युके ०७ एचसी १२३४) या आलिशान कारमधून भ्रमंती सुरू आहे. संबंधीत कारच्या पुढील काचेवर आमदार असा हिरव्या रंगातील स्टिकर लावण्यात आला आहे.

## मासेमारी बोटी बेपत्ता!

आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी खलाशांकडून केली जात आहे.याबाबत उरण परवाना अधिकारी सुरेश बागुलगावे यांच्याकडे व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी उरण परिसरातील पाचही बोटी सुखरूप परत आल्याची माहिती दिली, तर ससून डॉकमधील तीन बोटी अद्याप बेपत्ता असल्याचे सांगितले.

मात्र आजच्या घडीला मासेमारी करणाऱ्या अनेक बोटी या पारंपरिक पद्धतीने न करता बंदी असलेल्या जनरेटर व एलईडी लावून खुलेआम अधिकारी वर्गाच्या कृपाशिर्वादाने मासेमारी करत आहेत. आपले बिंग फुटू नये म्हणून अधिकारी बेपत्ता बोटींची माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याची चर्चा मच्छिमार बांधवांत सुरू आहे. ते आपल्याला माहिती नसल्याचे सांगून आपली जबाबदारी झटकताना दिसत आहेत. त्यामुळे अशा निष्क्रिय अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांची उचलबांगडी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## अंगणवाड्यांमध्ये मिळणार स्मार्ट शिक्षण

मदत होईल.रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, श्रीवर्धन, रोहा, म्हसळा, महाड, अलिबाग, पोलादपूर, कर्जत, खालापूर, सुधागड आणि पनवेल या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील.या प्रकल्पामुळे अंगणवाडी सेविकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण पद्धती व पोषण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच, बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल. नवीन अंगणवाड्या बालकांचे पोषण, आरोग्य तपासणी व पूर्व-शिक्षण अधिक परिणामकारकपणे पार पाडतील. तसेच गर्भवती व स्तनदा महिलांना आरोग्य सेवा आणि पोषण मार्गदर्शन सुलभपणे उपलब्ध होईल.

## किनेश्वर धरणाचे काम रखडले

पोलादपूर तालुक्यातील प्रतापगडाच्या पायथ्याशी अति दुर्गम भागातील किनेश्वर लघुपाटबंधारे योजनेला औरंगाबाद महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने २००९-१० मध्ये ७ कोटी ६४ लाख ५० हजार ८२६ रूपये खर्च करण्यास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून तत्पूर्वीचे लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी यासाठी मागणी केली असल्याचे टिपणीमध्ये नमूद करण्यात आले आहे. सदर योजनेच्या क मुख्य कामे आणि ड विमोचकाच्या कामाच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता स्थानिक स्तर लघुपाटबंधारे पुणे यांनी तांत्रिक मान्यता दिली असून धरणाची लांबी २०५ मीटर्स असून सांडव्याची लांबी ४० मीटर व उंची २८ मीटर असून हे धरण नैसर्गिक नाल्यावर बांधण्यात येणार आहे.या धरणातील एकूण पाणीसाठा १६८०.९३ स.घ.मी. एवढा होणार असून उजवा तीर कालवा ३ कि.मी. आणि डावा तीर कालवा २ कि.मी. असणार आहे. या किनेश्वर धरणामुळे १११ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे या संदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या लघुपाटबंधारे स्थानिक स्तर ठाणे च्या कार्यकारी अभियंता व माणगांव लघुपाटबंधारे उपविभागामार्फत टिपणीमध्ये नमूद केले आहे.

सद्यस्थितीत किनेश्वरच्या नियोजित धरणामुळे १११ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा असताना धरण आणि कालव्यासाठी भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मोबदले मिळाले नाहीत. मात्र, किनेश्वर धरण परिसरातील कापडे खुर्द, किनेश्वर या गांवातील शेकडो एकर जमिनींची खरेदीखते एकाच व्यक्तीच्या नावाने कमाल जमिनधारणा कायद्यातील निर्बंधांकडे दुर्लक्ष करून खासगीरित्या खरेदी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. ही जमीन खरेदी धरणासाठी भूसंपादित क्षेत्रापैकी आहे अथवा डॅमच्या परिसरात शेतीऐवजी महाबळेश्वर रस्ता रूंदीकरणाच्या पार्श्वभूमीवर रिसॉर्ट अथवा फार्महाऊस विकसित करण्यासाठी आहे, याचा उलगडा होऊ शकला नाही. संबंधित जमिनी भूसंपादित क्षेत्रापैकी असल्यास शेतकऱ्यांना अद्याप या जमिनीचा शासनाकडून मोबदला मिळाला नसल्याने याच जमिनीचे खरेदी अथवा विक्रीचे व्यवहार कसे होऊ शकतात? अशी शंका स्थानिक शेतकऱ्यांकडून उपस्थित होत आहे.

## सुलभ शौचालयात मतदार नोंदणी

मोर्चेबांधणीला सुरू झाली आहे. तसेच निवडणूक आयोगाकडून मतदार नोंदणी प्रक्रियाला सर्वात करण्यात आली आहे. अशातच नवी मुंबईत निवडणूक यादीत घोळ झाल्याचा प्रकार समोर आला आहे. मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी हा प्रकार उघडकीस आणला आहे. त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांनीच जारी केलेली बेलापूर विधानसभा (क्रमांक १५१) मधील अधिकृत मतदार यादी सादर केली. त्या यादीतील १४८ क्रमांकाच्या मतदार यादीत अनुक्रमांक ५१ वर एका मतदाराचे नाव असून, त्याचा पत्त्यासमोर सुलभ शौचालय असा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच काळे यांनी सांगितले, या शौचालयामध्ये कोणीही वास्तव्यास नाही. तरीही त्या पत्त्यावर मतदार नोंदणी झाली आहे. हे अत्यंत गंभीर असून निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.त्यांनी काळे यांच्या सांगण्यानुसार, या प्रकरणाची माहिती त्यांनी बेलापूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दिली असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे. या प्रकारामुळे मतदार नोंदणी प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत शंका निर्माण झाली असून, या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी विविध स्तरांतून केली जात आहे.

## मंदिरातील पुजाऱ्याची आत्महत्या

पुजारी जैन मंदिरात नित्य पूजाविधी करण्यासाठी आला होता. गुजरात राज्यातील रा. वालपरी, पो. माकणी, ता. बोरडिली, जि. छोटा उदयपूर येथील मूळ रहिवासी असलेला हा पुजारी सध्या आराधना भवन येथील तिसऱ्या माळ्यावरील एका खोलीत त्याची पत्नी पिंपकलबेन राठवा हिच्यासह राहत होता. नेहमीप्रमाणे दुपारचे जेवण उरकल्यानंतर हा पुजारी तिसऱ्या माळ्यावर गेला आणि त्याने आत्महत्या केली. त्यानंतर काही वेळातच पंख्याला लटकलेल्या स्थितीत त्याचा मृतदेह आढळून आला. पुजाऱ्याची पत्नी पिंपकलबेन मयुरकुमार राठवा हिने दिलेल्या फिर्यादीनुसार, या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. पुजाऱ्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप समोर आले नसून याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस ठाण्यातील पोलीस हवालदार महेश रुईकर अधिक तपास करीत आहेत.

## धमकी देत मुलीवर अत्याचार

मुलीला आपल्या घरी बोलावले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. हा प्रकार गेली दीड वर्षे सुरू होता. जाच असह्य झाल्याने अखेर या मुलीने अलिबाग पोलीस ठाणे गाठले आणि आपल्यावरील अत्याचाराची तक्रार दिली. तिच्या तक्रारीवरून आरोपी तरूण दीर्घ काळ पीडित मुलीचा मानसिक व शारीरिक छळ करत असल्याचे समोर आले आहे.

**उपविभागीय अधिकारी यांचेपुढे चालू असलेल्या कुळवहिवाट / अधिकार अभिलेख संबंधीच्या दाव्यातील पक्षकारांना द्यावयाची नोटीस**

क्र.आरटीएस/कात.५/अर्ज क्र.१०८/२०२५

**जाहीर नोटीस**

१) श्री. प्रकाश शंकर पालांडे
रा. आसूफ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड — अर्जदार

विरूद्ध

१) श्री. द्वारकानाथ भाऊ शिर्के — सामनेवाला
२) श्री. विश्वनाथ भाऊ शिर्के
३) श्रीम. मिनाक्षी मनोहर दळवी
४) श्रीम. अर्चना अनिल पालांडे
५) श्रीम. दिपीका दिपक विचारे
६) श्री. शहाजी बाबाजी शिर्के
७) श्रीम. रजनी अशोक सावंत
८) श्री. स्वप्निल सुरेश पालांडे
९) श्रीम. श्वेता सुरेश पालांडे
अ. क्र. ६ ते ९ रा.बी १०३, आशापुरा हेरिटेज को. ऑप. हाऊसिंग सोसायटी दायलँड कॉम्प्लेक्स, चारकोप गाव कांदिवली वेस्ट
१०) श्रीम.स्वप्ना सुरेश पालांडे
११) श्री. प्रभाकर शंकर पालांडे
सर्व रा. आसूफ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

अर्जदार/सामनेवाला यांस यावरुन कळविणेत येते की, मौजे आसूफ, ता. श्रीवर्धन येथील फेरफार क्र. २४६ च्या नोंदीविरुध्द विलंबमाफीसह अपील दाखल केले आहे. सदर प्रकरणी सुनावणी उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांचे कार्यालयात दिनांक ०६/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्याचे ठरविले आहे. तरी तुम्ही अथवा तुमचे प्रतिनिधी यांनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्या पुराव्यानिशी तुमचे म्हणणे मांडण्यासाठी सदरहू दिवशी, सदरहू जागी व वेळी माझ्यापुढे हजर राहिले पाहिजे. उपनिंदिष्ट वेळी व जागी अशा तऱ्हेने तुम्ही उपस्थित न राहिल्यास तुमच्या अथवा तुमच्या प्रतिनिधीच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निकाल केला जाईल. यापुढील सुनावणीची तारीख घेण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहिल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(महेश पाटील)**
**उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन**
**उपविभाग श्रीवर्धन**

**उपविभागीय अधिकारी यांचेपुढे चालू असलेल्या कुळवहिवाट/अधिकार अभिलेख संबंधीच्या दाव्यातील पक्षकारांना द्यावयाची नोटीस**

क्र.आरटीएस/कात.५/अर्ज क्र.११२/२०२५

**जाहीर नोटीस**

१) श्री. मोतीराम बाळाराम परबळकर — अर्जदार
२) श्री. सुभाष पांडूरंग चव्हाण
रा.सर्वे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड

विरूद्ध

१) श्रीम. बेबीबाई किसन भाये — सामनेवाला
२) श्रीम. नंदाबाई हरिश्चंद्र नायनेकर
अ.क्र.१ व २ रा. मु.पो. गोंडघर, ता.म्हसळा, जि.रायगड
३) श्रीम. कुसुम शिवराम चव्हाण
४) श्रीम. शांतीबाई हरिश्चंद्र नायनेकर
अ.क्र.३ व ४ रा. सर्वे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
५) श्री. किरीट ईश्वरलाल ब्रह्मभट्ट,
रा. ४०२-४०३ श्री वर्धमान बिल्डींग २९-बी खोताची वाडी, वी.पी. रोड मुंबई, गिरगाव, मुंबई ४०० ००४
६) श्री. हशमत इब्राहिम मुकादम ७) श्रीम. निर्मला नथुराम ढऊळ
८) श्रीम. यमुबाई जगन्नाथ नायनेकर ९) श्री. नामदेव रामचंद्र शिगवण
१०) श्री. गजानन रामचंद्र शिगवण ११) श्री. प्रदीप गजानन शिगवण
१२) श्रीम. संगीता अनंत केंद्रे १३) श्रीम. सुलोचना नारायण जाधव
१४) श्रीम. शर्मिला गजानन मोकल १५) श्री. विश्वास गोपाळ चव्हाण
अ.क्र.६ ते १५ रा. सर्वे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड
१६) श्री. परशुराम गोपाळ चव्हाण (मयत)
१६.१) लक्ष्मी परशुराम चव्हाण, १६.२) वर्षा गणपत कदम
१६.३) सुंदरा वासुदेव चव्हाण १६.४) उषा रमेश गोरिवले
१६.१ ते १६.४ रा. सर्वे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
१७) श्रीम. इंदू सहादेव शिंदे
१८) श्रीम. बयो गोपाळ साळवी
१९) श्री. अनंता पांडूरंग चव्हाण
२०) श्रीम. सुनिता पांडूरंग चव्हाण
अ.क्र. १७ व २० रा. सर्वे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

अर्जदार/सामनेवाला यांस यावरुन कळविणेत येते की, मौजे सर्वे, ता. श्रीवर्धन येथील फेरफार क्र. ९७० रद्द करणेबाबत विलंबमाफीसह अपील दाखल केले आहे. सदर प्रकरणी सुनावणी उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांचे कार्यालयात दिनांक ०६/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्याचे ठरविले आहे. तरी तुम्ही अथवा तुमचे प्रतिनिधी यांनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्या पुराव्यानिशी तुमचे म्हणणे मांडण्यासाठी सदरहू दिवशी, सदरहू जागी व वेळी माझ्यापुढे हजर राहिले पाहिजे. उपनिर्दिष्ट वेळी व जागी अशा तऱ्हेने तुम्ही उपस्थित न राहिल्यास तुमच्या अथवा तुमच्या प्रतिनिधीच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निकाल केला जाईल. यापुढील सुनावणीची तारीख घेण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहिल याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- श्रीवर्धन
दिनांक :- १६/१०/२०२५

सही/-
**(महेश पाटील)**
**उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन**
**उपविभाग श्रीवर्धन**

**जाहिर निविदा**
**ग्रुप ग्रामपंचायत पाणराई**
**ता. माणगाव, जि. रायगड** — दिनांक २९/१०/२०२५
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई, ता. माणगाव, जि. रायगड**
१५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी अंतर्गत विकास कामांची व साहित्यांची निविदा खालीलप्रमाणे

| अ. क्र | कामाचे नाव / साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भिनाड येथे गणेश वाघरे यांचे घरापासून टाकीकडे भुमिगत गटार व रस्ता करणे. | ६५६७२/- | २००/- | ६५७/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| २. | सिद्धार्थ नगर गटार व रस्ता करणे. | ७६८८४/- | २००/- | ७६९/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ३. | मुळगाव पाणसई गटार व रस्ता करणे. | ६५६६२/- | २००/- | ६५७/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ४ | पाणसई आ. वाडी येथे पाण्याचे डोहाचे बांधकाम करणे. | ५०,०००/- | २००/- | ५००/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ५ | करंजेवाडी पिण्याच्या पाण्याचा आड दुरुस्ती करणे. | ७९१७४/- | २००/- | ७९२/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ६. | भिनाड विहीर दुरुस्ती करणे. | ६००००/- | २००/- | ६००/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ७ | पाणसई बौद्धवाडी येथे स्मशान भूमी दुरुस्ती करणे. | ७३०००/- | २००/- | ७३०/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | ग्रामनिधी (१५% मागासवर्गीय खर्च) |
| ८ | पाणसई आ-वाडी प्राथमिक शाळेचे छप्पर दुरुस्ती करणे. | ५००००/- | २००/- | ५००/- | ०६/११/२०२५ सायं ०५:०० वा | दिनांक ०७/११/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | ग्रामनिधी (१५% मागासवर्गीय खर्च) |

**अटी व शर्ती :**
१. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत पाणसई येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातुल शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/- **ग्रामसेवक** **ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**
सही/- **सरपंच** **ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-18/25-26 7000037724 ...3rd call | Supply, Erection & commissioning of split air conditioning system at 400kV R.S. Nagothane, 220kV Washala, 100kV Murbad and Shahapur S/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee: Rs. 500/- + GST.** | Rs. 59.74 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 29.10.2025 to 10.11.2025 up to 11:00 hrs, Opening date: 10.11.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ऑफलाईन निविदा सूचना**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ऑफलाईन निविदा व १ नमुन्यातील खालील नमुद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/मल. वि/४४/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल महानगरपालिकेचे मुख्यालय व अग्निशामक ईमारतीमधील शौचालयांची आवश्यकतेनुसार सुधारण दुरुस्ती नुतनीकरण करणेबाबत. | ८,१६,३९४/- | ८,२००/- | ५९०/- |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक. ३०/१०/२०२५ पासून दि. ०६/११/२०२५ पर्यंत सायं ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) पनवेल महानगरपालिका मलनि:स्सारण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्रं.१ मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक ०६/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण विभागात स्विकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. ०६/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५ प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र/पमपा/मल.वि/४८२५/प्र.क्र.१२/१३७७/२०२५
दिनांक २९/१०/२०२५

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मे.भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. तर्फे श्री.मौलिक एम. कपाडिया टेरिटरी मॅनेजर रिटेल, प्रतिक्षा नगर, आयओसी टरर्मिल जवळ, वडाळा पुर्व, मुंबई. | ०३ निंब, ०१ सुबाभुळ व ०१ जांभुळ अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका होतील प्लॉट नं. १३२. १४३ व १४४, सेक्टर ०९. नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड येथील ०३ निंब ०१ सुबाभुळ ०१ जांभूळ अशी एकूण ०५ झाडे हे वाहतुक जाण्यायेण्यासाठी व ड्रेनेज कनेक्शन करण्यासाठी बाधित होत आहे. |
| २. | ललिता आत्माराम म्हात्रे. वास्तुसंकल्प, भुखंड क्र. १३३, मिडल क्लास हौसींग सोसायटी, पनवेल, जि. रायगड. | ०१ आंबा व ०१ गुलमोहर अशी एकूण ०२ झाडे तोडणे, | पनवेल महानगरपालिका हद्दीतील वास्तुसंकल्प, भुखंड क्र.१३३. मिडल क्लास हौसिंग सोसायटी, पनवेल येथील ०१ आंबा व ०१ गुलमोहर अशी एकूण ०२ झाडे हे धोकादायक असून सुरक्षा भिंतीला तडे गेले असल्याने. |
| ३. | Secretary/Chairman, Satyam Co-Op. Housing Society Ltd., Plot No. 23, Sector- 1. Kalamboli, Tal.- Panvel, Dist.- Raigad. | २ पिंपळ व ०१ वड अशी एकूण ०३ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Satyam Co-Op. Housing Society Ltd., Plot No. 23. Sector Panvel, Dist.- 1. Kalamboli, Tal.- Panvel, Dist.- Raigad. २ पिंपळ व ०१ वड अशी एकूण ०३ झाडांची मुळे सोसायटीच्या पाण्याच्या टाकीत गेले असल्याचे तसेच सदर सोसायटीची सुरक्षा भिंत पडण्याच्या स्थितीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

PMC-PARK/643/2025-PTAD

सत्यमेव जयते

**जाहीर आवाहन**

महाराष्ट्र शासन

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण ता.पेण जि.रायगड या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या जिल्हा रायगड, जिल्हा रत्नागिरी, जिल्हा सिंधुदुर्गमधील नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक या कार्यालयाचा कार्यारंभ आदेश जा.क्र. प्रशा-२०२५/प्र.क्र.०५/का.२(२)/६२५८ दि.०५/०८/२०२५ अन्वये शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत बाहयस्त्रोत संस्था मे छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व मे, महाराष्ट्र विकास ग्रुप यांना आदेश देण्यात आले आहेत.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण ता पेण जि रायगड या कार्यालयांतर्गत एकूण १५ शासकीय आश्रमशाळा येत असून, सदर आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक या रिक्त पदांवर (कंत्राटी पदे) पात्र उमेदवारांना अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

**पात्रता :-**

| Sr No | Post | Education |
|---|---|---|
| 1 | Higher Secondary Teacher | MA/MSC (Specialized Subject-Math/Physics/ Chemistry Biology) & B. Ed (Compulsory) & Tait Score |
| 2 | Secondary Teacher | BA/BSC ( Specialized Subject English/Math/Physics/ hemistry Biology) & B. Ed (Compulsory) & Tait Score |
| 3 | Graduate Primary Teacher | D.Ed & TET-2/CTET -2 (Compulsory) & Tait Score |
| 4 | Primary Teacher | D.Ed & TET-1/CTET -2 (Compulsory) (English Medium) & Tait Score |
| 5 | (English Medium) Primary Teacher (Marathi Medium) | D.Ed & TET-1/CTET-1 (Compulsory) (Marathi Medium) & Tait Score |

**तरी इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांनी खाली दिलेल्या लिंकवर अर्ज भरण्याची कार्यवाही दि. २९/१०/२०२५ ते दि.०७/११/२०२५ या कालावधीत करावी.**

| अ.क्र | विभाग | अर्ज करावयाची वेबसाइट |
|---|---|---|
| १ | अपर आयुक्त नाशिक व ठाणे | https://scsmltd.com/ |
| २ | अपर आयुक्त अमरावती व नागपूर | https://mvpcompany.in |

सविस्तर माहिती लिंकवर उपलब्ध आहे.

स्वा/-
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण**

## निवडक



### भारतीय किसान संघातर्फे मुरूड तहसीलदारांना निवेदन

**कोर्लई :** गेल्या काही दिवसांपासून पडलेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या भात पिकांचे पंचनामे करण्याबाबत, शेतमालाची सरकारी खरेदी केंद्रे सुरू करणे, वन्यप्राण्यांमुळे भात पिकाचे नुकसान व त्रासापासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे, पूरपरिस्थिती पार्श्वभूमीवर गुरांसाठी चारा उपलब्ध करणे, रब्बी हंगामातील कडधान्ये लागवड आदी मागण्यांबाबत भारतीय किसान संघातर्फे तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र काटकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यासाठी एक निवेदन मुरुड तहसीलदार आदेश डफळ यांजकडे सादर करण्यात आले. या निवेदनाच्या प्रती राज्याचे कृषिमंत्री, पणन मंत्री, वनमंत्री, जिल्हाधिकारी रायगड, मुख्य वनसंरक्षक कोकण विभाग, पशुसंवर्धन आयुक्त मुंबई यांना देण्यात आल्या आहेत. यावेळी भारतीय किसान संघाचे तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र काटकर, पांडुरंग घाणेकर, सुदाम वाघिलकर, प्रवीण बैकर, महेंद्र चौलकर, जयवंत अंबाजी, गायत्री आयरे, जनार्दन खोत, शरद पाटील आदी उपस्थित होते.

### उरणमध्ये गॅस माफियांचा पर्दाफाश

**उरण :** तालुक्यात गॅस सिलेंडरच्या नावाखाली सुरू असलेला बेकायदेशीर धंदा अखेर पोलिसांच्या सापळ्यात अडकला आहे. घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरमधून अवैधरित्या गॅस काढून त्याची काळाबाजार करणाऱ्या रॅकेटवर उरण पोलिसांनी धडक कारवाई केली असून स्थानिक गॅस माफियांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. द्रोणागिरी सेक्टर ५० परिसरात पुरवठा निरीक्षण विभाग आणि उरण पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली आहे. जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५ चे उघड उघड उल्लंघन करत हे रॅकेट व्यावसायिक सिलेंडरमधील गॅस एका लोखंडी पाईपच्या साहाय्याने काढून तो घरगुती सिलेंडरमध्ये भरत होते. नंतर हे सिलेंडर बेकायदेशीरपणे विक्री करून ते हजारोंची कमाई करत होते. प्रभारी पुरवठा निरीक्षक प्रभाकर पद्माकर नवाळे यांच्या लेखी तक्रारीवरून उरण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिसांनी कारवाईदरम्यान तब्बल २४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात भारत गॅस कंपनीचे २७७ व्यावसायिक सिलेंडर, एचपीचे ५ किलो वजनाचे ६० भरलेले व ८ रिकामे घरगुती सिलेंडर, एक टाटा टेम्पो, दोन बोलेरो जीप आणि अवैध गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारा लोखंडी पाईप यांचा समावेश आहे. यावेळी पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्यापैकी तीन जणांना घटनास्थळीच अटक करण्यात आली आहे. अटककेलेल्यांमध्ये बालाजी साळवी (४०), मनोहर गोंड (३६) आणि सुरेशकुमार माजरा (३०) या तिघांचा समावेश आहे. या कारवाईनंतर उरण तालुक्यातील अवैध गॅस व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ माजली आहे.

### मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** कोयत्याने कपाळावर, मानेवर, छातीवर वार करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी मयूर पाटील आणि प्रफुल्ल पवार यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि.२८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश तळेकर हे विचुंबे येथे राहत असून त्यांना मयूर पाटील याने व्हाट्सअपवर कॉल आणि मेसेज करून वाढदिवसानिमित्त बॅनर बनवून कामोठे येथे पाहिजे असल्याचे कळवले. यावेळी तळेकर यांनी बॅनर तयार करण्यास नकार दिला. त्यानंतर प्रफुल्ल पवार आणि मयूर पाटील हे गणेश तळेकर यांच्या बिल्डिंग खाली आले. त्यांना बिल्डिंग खाली बोलावून घेतले आणि बॅनर तयार करण्यास सांगितले. परंतु, तळेकर यांनी मयूर पाटील याला बॅनर बनवण्यास नकार दिला. या गोष्टीचा राग आल्याने प्रफुल्ल पवार याने तळेकर यांची कॉलर पकडली आणि कोयत्याने त्यांच्या कपाळावर, मानेवर, छातीवर आणि दंडावर वार केले. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

### रामवाडी पुलावरील दिवे उजळले

**खरोशी :** गेल्या तीन महिन्यांपासून पेणहून रामवाडी दिशेच्या डाव्या बाजूच्या सर्व्हिस रोडवर आणि रामवाडी पुल परिसरातील रस्त्यावरील पथदिवे बंद असल्यामुळे त्या भागात अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले होते. या अंधारामुळे रात्री प्रवास करताना प्रवाशांच्या मनात भीतीचे वातावरण होते. तसेच, गणेशोत्सव काळातही प्रचंड समस्या निर्माण झाल्या होत्या. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते जीवन पाटील यांनी ई-मेलद्वारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री कार्यालयात हा विषय पोहोचवला. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून मंगळवारी (दि.२८) येथील पथदिवे सुरू केले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# प्रती गुंठा पाच हजार रुपये भरपाई द्या

## ॲड. राकेश पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यांतील शेतकऱ्यांचे अवकाळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रतिगुंठा ५ हजार रुपये नुकसान भरपाई शासनाने द्यावी, यासाठीचे निवेदन शेतकरी नेते ॲड राकेश पाटील यांनी जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे यांना दिले आहे.

सध्या राज्यासह रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मे महिन्यापासूनच पावसाने बरसायची सुरूवात केली असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राब जाळण्यापासून लावणी व आता कापणीपर्यंत वेळोवेळी हैराण करून सोडले आहे. सध्या भात कापणीला आला असून काही शेतकऱ्यांनी भात कापून ठेवले असता अवकाळी पावसामुळे ते भिजले असून त्यांना कोंब देखील आले आहेत. ज्यांचे कापायचे बाकी आहेत त्यांच्या शेतातही तिच परिस्थिती आहे. त्यामुळे



जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला असून संपूर्ण मेहनतीवर पाणी फेरले आहे. त्यांना प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील यांनी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राबरोबरच देशाच्या विकासामध्ये हातभार लावण्याच्या बाबतीत रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा देखील मोठा त्याग आहे. यंदा पावसाने मे महिन्यापासूनच सुरूवात केल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी केलेले भात बियाणे पावसात वाहून गेले, तर काही ठिकाणी ते कुजल्यामुळे त्या वाणाची लावणीच करता आलेली नाही. त्यानंतर येथील शेतकऱ्यांनी पुन्हा अतिवृष्टीतही अनेक संकटांना सामोरे जात भातपिकाची शेतीमध्ये लावणी केली आहे. सद्यस्थितीमध्ये शेतीमधील भाताचे पीक कापणीसाठी तयार झाले आहे. परंतु, अतिवृष्टीमुळे ते चिखलात गाडले गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातामध्ये काहीही आलेले नाही. येथील शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन फक्त भातशेतीच आहे. त्यामुळे पुढील वर्षभर त्यांच्यावर आर्थिक संकट घोंगावत राहणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकार घाटमाथ्यावरच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी हेक्टरी क्षेत्राचा निकष लावते. त्या निकषाप्रमाणे जर येथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली तर चाराण्याची कोंबडी अन बाराण्याचा मसाला अशी गत होईल. आपण या जिल्ह्याचे पालक असून आपल्या अखत्यारीत येणाऱ्या १५ तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तलाठी पंचनामे करून प्रतिगुंठा ५ हजार रुपये देण्याबाबत सरकारला कळवावे. तसेच, रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कुळकायदा निर्माण करूनही काही ठिकाणी जमीन कसणारी कुळे असल्यामुळे नुकसानीची रक्कम सावकारास न देता शेती कसणाऱ्या कुळांना देण्याचे आदेश द्यावेत, असे ॲड. राकेश पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

**शेतकऱ्यांना मदत करण्याचे आवाहन**

सध्या जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल असून या जिल्ह्यात असणाऱ्या एमआयडीसी, सिडको, सदुर्शन व गेल कंपनी, जेएनपीटी बंदर यांसारख्या अनेक मोठ्या उद्योगांना येथील शेतकऱ्यांनी जमिनी देऊन मोठं केले आहे. त्यामुळे या उद्योगांचीही शेतकऱ्यांना मदत करण्याची नैतिक जबाबदारी असून जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित उद्योगांच्या अधिकाऱ्यांना मदत करण्याचे आवाहन करावे, असेही ॲड. राकेश पाटील यांच्याकडून सांगण्यात आले.

> **“महाराष्ट्र सरकार घाटावरच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी हेक्टरी क्षेत्राचा निकष लावते. येथील शेतकऱ्यांचे क्षेत्र गुंठ्यांमध्ये आहे. हेक्टरीच्या निकशाप्रमाणे येथील शेतकऱ्यांसाठी ती मदत तुटपुंजी ठरेल. जमिन विक्रीतून हजारो कोटींचा महसूल सरकारला रायगड जिल्ह्यातून मळितो. येथील शेतकऱ्यांच्या त्यागामुळेच हजारो कोटींची उलाढाल करणारे उद्योग याच जिल्ह्यात आहेत. शेतकऱ्यांना मदत करणे ही त्यांचीही नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे आणेवारीची कारणे न देता, तसेच शेतकऱ्यांच्या शेतीतील खर्च पाहता प्रती गुंठा ५ हजार रुपयांची मदत सरकारने करावी,**
> **– ॲड. राकेश पाटील, शेतकरी नेते”**

# सुधागड शेकापचे तहसीलदारांना निवेदन

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीच्या झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करून त्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे निवेदन सुधागड तालुका शेकापच्यावतीने तालुका चिटणीस अतिश सागळे यांनी तहसीलदार उत्तम कुंभार यांना दिले.



यावेळी शेकाप नेते सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीसह तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष किसन उमटे, नरेश बैकर, दिनकर काटकर, किशोर डोके, लक्ष्मण शिंदे, सुहास जंगम, गणेश दंत, मंगेश दंत, निलेश दंत, गणेश जाधव, संतोष धाटावकर, सुधीर साखरले आदींसह सुधागड तालुक्यातील शेतकरी, शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुरेश खैरे यांनी, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेल्या उभ्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी राजावर ओले संकट आले आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून या प्रसंगातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी महसूल व कृषी विभागाकडून तातडीने सरसकट पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत मळिण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# शिवशाही युवा प्रतिष्ठानतर्फे मागण्या

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे अवकाळी आणि परतीच्या पावसामुळे भात पिकांचे नुकसान झाले आहे. भातशेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे १०० टक्के नुकसान झाल्याबद्दल पंचनामे करावेत, अशी मागणी करणारे निवेदन शिवशाही युवा प्रतिष्ठानकडून तहसीलदार यांना देण्यात आले आहे. यावेळी प्रतिष्ठान अध्यक्ष सागर शेळके आणि शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा शेतकरी सागर शशिकांत शेळके यांनी शेतकऱ्यांच्यावतीने शासनाला



पत्र देऊन नुकसानी भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. निवेदनात तालुक्यातील सर्व प्रभावित शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून नुकसान नोंदविण्यात यावेत. तसेच, शासनामार्फत तातडीने शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे, खत व शेतीसाठी आवश्यक सवलतींचा लाभ देण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या.



# पेण तालुक्यातील बळीराजा संकटात

**| हमरापूर | प्रतिनिधी |**

परतीच्या पावसाने पेण तालुक्यात धुमाकूळ घातला असून मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऐन भात कापणीच्या हंगामात झालेल्या अवकाळी पावसामुळे भात शेती पाण्याखाली गेली आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला असून ऐन दिवाळीत बळीराजा संकटात सापडला आहे. या पावसामुळे पेण तालुक्यातील हमरापूर, जिते, खारपाडा, पूर्व भाग, वाशी, वडखळ, गडब, कासु, पाबळ, शिहू या भागातील जोडणी केलेले भात ओलाव्यामुळे भिजले असून उत्पादनावर परिणाम होणार आहे. गोरगरीब शेतकरी आपल्या घामातून मोत्याचा दाणा पिकवतो. मात्र, निसर्गाच्या या कोपामुळे त्याचे स्वप्न वारंवार चुरगळले जात आहे. शेतकऱ्यांनी कष्टातून तयार केलेली भातशेती पूर्णपणे भिजली आहे. पाऊस गेला असेल समजू शेतकऱ्यांनी आपली भातशेतीची कापणी केली. परंतु, विजांच्या कडकडाटासह पडत असलेल्या या पावसामुळे भातशेती पाण्याखाली आली आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

# शेतकऱ्यांना तातडीने मदत करा

## काँग्रेस, ठाकरे गटाची प्रशासनाकडे मागणी

**| रोहा | प्रतिनिधी |**

गेल्या अनेक दिवसांपासून अवकाळी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातल्याने शेती आणि कडधान्यांची नासाडी झाली आहे. अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाल्याने नुकसानग्रस्त शेतीचा पंचनामा करुन शेकतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी रोहा तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने लेखी निवेदनद्वारे करण्यात आली आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि.२८) दुपारी रोहा



तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांची भेट घेऊन अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेती विषयी चर्चा करुन मदत द्यावी, अशी मागणी केली. यावेळी तालुकाध्यक्ष सुनिल देशमुख, गजानन गायकर, भरत कान्हेकर महेश देशमुख आदी उपस्थित होते. तसेच, यासंदर्भात रोहा तालुका शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने देखील प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. त्यांनीदेखील मंगळवारी दुपारी रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांची भेट घेतली. य वेळी तालुकाध्यक्ष नितीन वारंगे, उप तालुका प्रमुख सचिन फुलारे, ज्ञानेश्वर दळवी, रोहिणी गोसावी, मंगेश जाधव, मनोज लांजेकर, अनिल वर्तक, चिंतामणी लहाने आदी उपस्थित होते.

# पीएनपीतील विद्यार्थ्यांना शस्त्रांची ओळख

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलमध्ये बुधवारी (दि.२९) पोलीस स्मृती दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अलिबाग पोलिसांच्या ४५ सदस्यीय पथकाने विद्यार्थ्यांना विविध शस्त्रांचे प्रात्यक्षिक दाखवून त्यांचा वापर कसा केला जातो, याची माहिती दिली.



या कार्यक्रमादरम्यान पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस दलाने दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी स्वतः चे संरक्षण कसे करावे, याचे प्रभावी मॉक ड्रिल सादर केले. तसेच, त्यांनी विद्यार्थ्यांना पोलीस दलाचे शौर्य, शिस्त आणि जनतेच्या सुरक्षेसाठी केलेल्या कार्याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. यावेळी रिझर्व्ह पोलीस इन्स्पेक्टर विजय बाविस्कर, पोलीस सब इन्स्पेक्टर स्वप्नील सावंत, हेड कॉन्स्टेबल विजय भालेराव, जीपीएसआय उत्तम बांबळे, इतर पोलीस अधिकारी यांच्यासह सीबीएसईच्या मुख्याध्यापिका एम वेल्लैयम्माल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मीला शेटे, विद्यार्थी, शिक्षक व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# रमेश मादरेचा यांचे निधन

**उरण :** चारभुजा येथील रहिवासी रमेश नानालाल मादरेचा यांचे मंगळवारी (दि.२८) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, जावई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शहरात शोककळा पसरली. सर्व व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली होती. त्यांच्यावर बोरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक, व्यापारी, विविध समाजघटक, नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होता.

## उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण | जबाबदार अभियंत्यांवर कारवाईची मागणी

# आदिवासी बांधवांच्या मागण्या मान्य

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत आपटा हद्दीतील कोरलवाडी येथील संतप्त आदिवासी ग्रामस्थ बुधवार दि.२९ ऑक्टोबरपासून पनवेल उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. रस्ता व पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या या वाडीतील ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी मागण्यांच्या पूर्ततेचे आश्वासन दिल्याने उपोषण स्थगीत करण्यात आले आहे.



नवी मुंबईपासून अवघ्या पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या कोरलवाडीत आजही रस्त्याचा व पाण्याचा प्रश्न कायम आहे. ग्राम संवर्धन सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदने, मोर्चे, आंदोलन आणि उपोषणे केली. त्यानंतर तीन वर्षांपूर्वी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना आणि दोन वर्षांपूर्वी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ (तारागाव) ते कोरलवाडी रस्ता मंजूर झाला. मात्र, आजही ही दोन्ही कामे अपूर्ण आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेले रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून एप्रिलमध्ये पूर्ण झालेले काम मे महिन्यात झालेल्या पावसातच वाहून गेले. या निष्काळजी कामामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

त्याचप्रमाणे जलजीवन मिशन योजनेचे काम मागील तीन वर्षांपासून रखडले असून, वाडीतील रहिवाशांना अद्याप स्वच्छ पाण्याचा पुरवठा सुरू झालेला नाही. तसेच, कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत भरलेले अर्ज, रेशनकार्ड व इतर कागदपत्रे आजतागायत वितरित न झाल्याची तक्रार देखील करण्यात आली आहे. या रखडलेल्या कामांसह कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत कोरलवाडीतील नागरिकांची प्रलंबित रेशनकार्डे आणि इतर प्रमाणपत्रे तात्काळ वितरित करण्याची देखील मागणी करण्यात आली होती. या मागण्यांसाठी पनवेल उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात आले होते.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उप विभागीय अधिकारी पनवेल यांच्या कार्यासमोर बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आपटा ग्रामपंचायत हद्दीतील जल जीवन मिशन योजनेतील पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या कोरल वाडी आणि इतर वाड्यांच्या पाईप लाईनचे काम पुढील चार दिवसात पूर्ण करून देण्याचे आश्वासन पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता पनवेल यांनी दिले आहे. तसेच, ४ नोव्हेंबर रोजी स्वतः उप विभागीय अधिकारी पवन चांडक यांच्याहस्ते त्याचे लोकार्पण होणार असून अंत्योदय योजनेतील पिवळे रेशन कार्ड थोड्या दिवसात देण्यात येणार आहेत. तसेच, येथील रस्त्याची दुरावस्था पाहण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या टीम सोबत पाहणी दौरा ठेवला असून त्याच दिवशी योग्य ते आदेश दिले जातील, असे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांनी आपल्या उपोषणाला सध्या स्थगिती दिली आहे.

# अत्याचारी पोलिसावर कारवाईची मागणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महिला डॉक्टरवर पोलिसाकडून करण्यात आलेल्या अत्याचार प्रकरणाबाबत कठोर कारवाई करण्याची मागणी पनवेल शेकाप महिला आघाडी महानगरपालिका जिल्हाध्यक्ष हर्षला तांबोळी यांनी पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

फलटण तालुक्यातील एका महिला डॉक्टरवर पोलिसाने अत्याचार केल्याची गंभीर घटना घडली. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि शासन व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि न्यायासाठी शासनाने अनेक योजना व कायदा लागू केले



आहेत. मात्र, जे अधिकारी कायदा अंमलबजावणीसाठी नेमलेले आहेत ते अशा प्रकारचे कृत्य करत असून कुंपणच शेत खात असेल तर न्याय कोणाकडे मागणार, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. त्यामुळे अशा घटनेची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित पोलिसावर कठोर शिक्षा करण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

# मालवणीचे राजदूत

मुंबई ही कोकणाचं परसदार असल्यासारखीच आहे. आज ती महानगरी, मायानगरी आणि विश्वनगरी झाली असली तरी कोकणवासियांना ती कधी परकी वाटली नाही. कोकणातली संस्कृती, भाषा, सण, उत्सव यांचे प्रतिबिंब मुंबईच्या सार्वजनिक जीवनात जितके पडलेले दिसते तितके अन्य प्रांतांचे दिसत नाही. दहीहंडी आणि गणेशोत्सव हे मुंबईतले दोन मोठे उत्सव झाले आहेत. त्यांचे मूळ कोकणाच्या भूमीत आहे. मुंबईच्या मराठी कलाविश्वामध्येही आजवर कोकणी लोकांचा वरचष्मा राहिलेला आहे. नाटक, चित्रकला आणि संगीताला असंख्य कलाकार कोकणाने दिले. त्यातही नाटक हा कोकणाच्या जिव्हाळ्याचा विषय. आजही गावागावांमधल्या उत्सवांमध्ये स्थानिक लोक उत्साहाने नाटके करतात. त्यामुळे मुंबईची नाट्यनगरी या लोकांनी भरलेली असली तर नवल नव्हे. गंमत म्हणजे असे असूनही या नगरीमध्ये कोकणामधील विविध बोलींमधील नाटके सादर होत नव्हती. त्याची सुरुवात करणारे व यशाचे पहिले मानकरी होते गंगाराम गवाणकर. त्यांच्या वस्त्रहरण नाटकामुळे इतिहास घडवला. सोमवारी रात्री गवाणकरांनी या जगाच्या रंगभूमीवरून एक्झिट घेतली आणि तो इतिहास थबकला. वस्त्रहरणमुळे मालवणी बोली मराठी रंगभूमीवर प्रस्थापित झालीच. पण त्यापाठोपाठ रायगड व ठाणे जिल्ह्यातील आग्री आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड वगैरे भागातील बाणकोटी अशा भाषेतली नाटकेही रंगमंचावर आली. पूर्वी उरण, नवी मुंबई वा ठाण्यापुरते मर्यादित असलेले आग्री नाटक शिवाजी मंदिरला दिसू लागले. यदाकदाचितमधून बाणकोटी बोली समोर आली. नंतर मराठवाडी, वैदर्भी, खानदेशी इत्यादी प्रांतातील नाट्यकर्मींनाही आपल्या भाषांमधून प्रयोग करण्याची प्रेरणा त्यांनी दिली. पण मालवणीइतके यश कोणालाच मिळाले नाही. मुंबईतील मराठी टक्क्यांमध्ये आणि प्रेक्षकांमध्ये मालवणीवाले अधिक संख्येने असल्याचा तो परिणाम होताच. पण त्याला इतरही कारणे होती. वस्त्रहरण हे केवळ मालवणी बोलीत होते म्हणून चालले नाही. त्यातील नाट्यवस्तू, आशय आणि मांडणी ही अत्यंत दमदार होती. वस्रहरणचे मराठी बोलीतले प्रयोगही चांगले यशस्वी झाले. किंबहुना, नंतर बहुतेक नामवंत विनोदी नटांना त्यात पाहुणे कलाकार म्हणून का होईना पण भूमिका करून पाहण्याचा मोह आवरला नाही.

## लिखाणाचे विविध प्रयोग

वस्रहरणच्या यशामध्ये मच्छिंद्र कांबळी यांच्या अभिनयाचा मोठा वाटा आहे यात शंकाच नाही. पण ते पहिल्यांदा रंगभूमीवर आल्याला जवळपास ४५ वर्षे होत आली तरीही ते ताजे वाटते आणि नवनवीन संचातही लोकांना आवडत राहते हे ध्यानात घेतले तर गवाणकरांच्या लिखाणाची ताकद समजेल. आज नाटक होयाचा नाय या नावाने मुळात त्यांनी ते छोटे नाटक लिहिले होते. कामगार नाट्यस्पर्धेत त्याने बहुदा पहिल्यांदा यश मिळवले. ते मुंबई आकाशवाणीवर कामगार सभेत सादर झाले. मग त्याचे पूर्ण नाटक झाले. थेट पु.ल. देशपांडे यांनी त्याची अपार स्तुती केली. त्यानंतर ते धोधो चालू लागले. या नाटकात आपल्याला काम करायला आवडले असते असे पुलंनी तेव्हा म्हटले होते. या नाटकानंतर मालवणी बोलीला नव्याने झळाळी मिळाली. त्यानंतर मालवणीतील नाटके तर आलीच, पण कथा व कादंबऱ्याही येऊ लागल्या. अनेक टीव्ही मालिका, सिनेमे यामध्ये मालवणी पात्रांची योजना होऊ लागली. यात एकच दुर्दैवाचा भाग म्हणजे वस्रहरण विनोदी नाटक असल्याने मालवणी पात्रे ही शिव्या देणारी किंवा विनोदी बोलणारी म्हणूनच सादर होऊ लागली. १९८० च्या दशकात जयवंत दळवी, खानोलकर हे यशस्वी लेखक गंभीर विषय मांडणारे व अधूनमधून मालवणी बोलीत संवाद लिहिणारे होते. पण पूर्ण नाटकाचा आशय मालवणीतून सादर करण्याची सुरुवात गवाणकरांनी केली. पण त्यांचा विशेष हा की ते तेवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी नंतर वन रुम किचनसारखे गंभीर नाटक लिहिले व त्याचेही हजारोंनी प्रयोग झाले. वात्रट मेले हे विनोदी असले तरी दोघी, सोबती यासारखे गंभीर लिखाणाचे प्रयोगही त्यांनी केले. ऐसपैस नावाची कादंबरी तसेच रवींद्रनाथ टागोरांच्या कथांचा अनुवाद असेही साहित्य त्यांच्या नावावर आहे. एकूणच पहिल्याच अभूतपूर्व यशानंतर तेच ते गिरवत न राहता नवे प्रयोग करण्याची उर्जा व उर्मी त्यांच्यात होती. यश वा अपयश येत वा जात राहते. पण त्याची पर्वा न करता आपल्याला हवे ते लिहिणारा व प्रयोग करणारा असा हा लेखक होता.

## खडतर आयुष्य

गवाणकर हे मूळचे राजापूर तालुक्यातील माडबनचे. जैतापूर अणुउर्जा प्रकल्पामुळे वादाच्या केंद्रस्थानी आलेले हे त्यांचे गाव. पण बहुतेक कोकण्यांप्रमाणे त्यांच्या घरातही अठरा विश्वे दारिद्र्य असल्याने जगायला ते लहानपणीच मुंबईत आले. डोक्यावर छप्पर नसल्याने चर्नीरोडच्या स्मशानात आसरा घेतला. पुढे विमानतळावर हमाली केली. जेजे स्कूलमधून डिप्लोमा घेतला. अनेक नोकऱ्या केल्या. पण डोक्यात किडा होता तो नाटकाचा. त्या दिशेने धडपड करीत राहिले. वस्रहरणचे मूळ नाटक त्यांनी १९७० च्या आसपास लिहिले होते. पण काही ना काही कारणाने ते कधीही रंगमंचावर येऊ शकले नव्हते. राजा मयेकर वगैरे नामवंतांनाही ते आवडले होते. पण त्याचे आरंभीचे नशीब गवाणकरांच्या आयुष्याप्रमाणे खडतर होते. नंतर कामगार नाट्यस्पर्धेत त्याने बाजी मारली. मग हळूहळू ते यशाच्या मार्गावर गेले. आयुष्यात इतके प्रचंड कष्ट व मानहानी सोसूनही गवाणकर कधीही निराश, कडवट वा दुःखी झाले नाहीत. मनाचा समतोल कधीही ढळला नाही. पुढे अफाट यश मिळाले. घरात ट्रॉफी ठेवायला जागा नाही म्हणून गोणत्यात भरून त्या गावी नेऊन ठेवायला लागल्या अशी परिस्थिती आली. तरीही त्यांचे पाय जमिनीवरून सुटले नाहीत. साध्या चाकरमान्याप्रमाणेच ते राहत व कोणाशीही आपलेपणाने बोलत. मालवणी नाटकाचे जनक अशी पदवी त्यांना अनेकांनी दिली. पण ते हुरळून गेले नाहीत. किंवा मालवणीचे कट्टर अभिमानी वगैरे झाले नाहीत. अगदी आरंभीच्या काळात वस्रहरण नाटकात त्यांनी स्वतःही काम केले होते. त्यातले तात्या सरपंचाचे पात्र हे एकाच वेळी इरसाल पण त्याच वेळी सर्वांना सांभाळून घेणारे असे आहे. वस्रहरण हे यशस्वी झाले नसते तरीही गवाणकर निराश झाले नसते व असेच समजूतदारपणे पुढे गेले असते यात शंका नाही. मराठी चित्रपटांमुळे सरपंच म्हणजे कोल्हापुरी बोलीत बोलणारा निळू फुल्यांचा खलनायक अशी प्रतिमा रुढ झाली होती. पण गवाणकरांनी वेगळ्या व वास्तवाच्या अधिक जवळ असलेल्या सरपंचाची मराठी लोकांना ओळख करून दिली. तो बेरकी असला तरी खलनायक नव्हता. गावकऱ्यांवर सत्ता गाजवणारा नव्हता. वस्रहरणच नव्हे तर गवाणकरांच्या सर्वच नाटकातील पात्रे ही खऱ्याखुऱ्या माणसांना जवळची होती. कारण, गवाणकर त्यांच्याकडे गोष्टीतील पात्रे म्हणून नव्हे तर हाडामासाची माणसे म्हणूनच पाहत होते. आपल्या कोकणाच्या लाल मातीतील माणसांना लेखणीने जिवंत करणाऱ्या या लेखकाला आदरांजली.

विचार

# माहिती तंत्रज्ञान उजळवतेय शिक्षणक्षेत्र

***इतर क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून एक प्रकारची क्रांती अनुभवायला मिळत आहे. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

नव्या युगात शिक्षणक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानाचे महत्व वाढले आहे. महत्वाचे म्हणजे हा बदल ग्रामीण भागातही पहायला मिळत असून माहिती तंत्रज्ञानाने शिक्षणाच्या क्षेत्रात घडवून आणलेली क्रांती आपण सर्वजण पहात आहोत. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.

ताज्या निष्कर्षांनुसार सर्वाधिक तरूण लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक खूपच वरचा आहे. अर्थातच देश प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आणि वैयक्तिक जीवनमान उंचावण्यासाठी तरूणाईला योग्य शिक्षण- प्रशिक्षण देण्याची मोठी गरज आहे. तरूणाईला विकास हवा आसल्याचे त्यांनी विविध मार्गाने स्पष्ट केले आहे. आजच्या शाळकरी तसेच कॉलेजवयीन विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आहे, परंतु आतापर्यंतच्या धोरणांमुळे म्हणा वा अन्य कारणांनी म्हणा, त्यांना पुरेशी संसाधने (शिक्षकांपासून उपकरणांपर्यंत) पुरवण्यात यंत्रणा नेहमीच कमी पडली आहे. बरे रस्ते, अन्नपाणी, कपडे, वह्या-पुस्तके, घरातील परिस्थिती आणि आसपासचे वातावरण आदी सामाजिक-आर्थिक बाबींमध्ये अपूर्णत्व असूनही छोटी मुले-मुलीदेखील चारचार मैल चालून शाळेत जाताना आपण पाहतो आणि हळहळतो, कारण सर्व संसाधने पुरवणे कधी कधी प्रशासनालाही अवघड असते. दुसरीकडे, बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या आणि खाजगी शाळांमध्ये जातात, असा अनेकांचा समज असतो. काही अंशी हे खरे आहे. पण हे चित्र शहरी आणि तुलनेने संपन्न ग्रामीण भागात बघायला मिळते, हे विसरुन चालणार नाही. आजही सर्वाधिक विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिकतात आणि इतक्या व्यापक प्रमाणावर अशा प्रकारे शिक्षण पुरवणारी भारतातील सरकारी यंत्रणा जगात सर्वात मोठी आहे. मात्र इतक्या विस्तृत आणि सुस्थापित शैक्षणिक जाळ्याचा वापर दर्जेदार शिक्षण देण्यासाठी केला जात नाही हे आपल्या यंत्रणेचे अपयश म्हणजे देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल.

या पार्श्वभूमीवर इंटरनेटने कशी क्रांती घडवली आहे ते पाहणे गरजेचे ठरते. ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या विद्यार्थ्याला एखाद्या अभ्यासक्रमाची माहिती हवी असेल तर अगदी अलिकडपर्यंत तो मिळेल त्या वाहनाने किंवा खरे तर बरेचदा चक्क चालतच तालुक्याचे गाव गाठत असे. तिथे एखादी चांगली शिक्षणसंस्था असेल तर ठीक, नाही तर पुन्हा प्रवास करून तो जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा शहरात येई. संबंधित संस्थेचा पत्ता शोधून कार्यालयातून माहिती मिळवण्यात त्याचे दोन-तीन दिवस सहज जात. एवढ्या उद्योगानंतर त्याला योग्य ती माहिती मिळाली असेल तर ठीक, अन्यथा अजून कळले नाही, नोटिस निघालेली नाही, चार दिवसांनी फोन करा किंवा येऊन बोर्डावर पहा असे उत्तर मिळाले की पुन्हा पुढच्या आठवड्यात हीच यात्रा काढण्याखेरीज पर्याय नसायचा. हा विद्यार्थी एकट्याने प्रवास करण्याइतका मोठा नसेल तर सोबतीला वडील, काका-मामा अशांना जावे लागायचे. म्हणजे दुप्पट खर्च आणि तेवढीच यातायात. इथे मुलींची म्हणजे विद्यार्थिनींची परिस्थिती तर आणखी बिकट व्हायची. मुलींनी शिकायचेच कशाला, मुलीच्या शिक्षणावर खर्च करून आमचा फायदा काय असे प्रश्न आपल्याकडे अजूनही मोठ्या प्रमाणात विचारले जात असल्याने तिची पुढची शैक्षणिक वाट तर बहुधा बंदच होऊन जाते. मात्र अशा सरस्वतीच्या लेकींच्या आयुष्यात इंटरनेट महत्त्वाची क्रांती घडवू शकते, हे आता सर्वांना समजले आहे.

विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी किंवा तो अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आपण शिक्षणाचे दोन भाग करू या. शालांत परीक्षेपर्यंतचे आणि त्यानंतरचे, असे हे दोन भाग करता येतील. नंतरच्या शिक्षणामध्ये अधिक पर्याय असल्यामुळे समजून घेऊन त्यानुसार कृती करण्यात आणि विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची दिशा ठरवण्यात माहिती तंत्रज्ञान मोठी भूमिका बजावते. परंतु त्याकडे नंतर नजर टाकू. इंटरनेटच्या सहाय्याने प्राथमिक शिक्षणाचा पाया पक्का करता येतो का, हे आधी पाहू. सरकारी पातळीवर (विशेषतः मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून) काय प्रयत्न सुरू केले आहेत, हे बघू.

वस्तुतः सरकारी प्रयत्नांची माहिती देणाऱ्या बऱ्याच वेबसाइट्स आहेत. सर्व शिक्षा अभियानासंबंधी माहिती देणाऱ्या या वेबसाइट्स वापरून एखाद्या राज्यातील एखाद्या तालुक्यामध्ये कोणत्या शाळा कोणत्या गावात आहेत हे शोधता येते. आयुष्यात एका टप्प्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागते ते त्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे. सध्या उच्च शिक्षण तर भयंकर महाग होत चालले आहे. अशा वेळी पात्र आणि हुषार विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या अर्थात स्कॉलरशिप्स पुरवणाऱ्या असंख्य व्यक्ती आणि संस्था आहेत. इंटरनेटच्या कृपेने झाडून अशा साऱ्या शिष्यवृत्त्यांची माहिती काही क्लिक्समध्ये झटपट मिळू शकते. यासाठी स्कॉलरशिप्स किंवा फ्रीशिप्स असा सर्च द्यावा. अर्थात हे काम करण्यासाठी आपण 'शिक्षा' च्या वेबसाइटचाच वापर केला पाहिजे असे नाही; हा शोध सर्च इंजिन उघडून स्वतंत्रपणेही घेता येतो.

शिक्षणक्षेत्रात आयटीचा इतक्या खोलवर शिरकाव झाल्याने विद्यार्थ्यांना करावी लागणारी अनुत्पादक पायपीट आणि खर्चात मोठी बचत झाली असून अधिक नेमकपणाने संस्थांची निवड करणे आता शक्य झाले आहे. अशा उपक्रमांमध्ये प्रौढ शिक्षण, कामगारांसाठीच्या रात्रशाळा तसेच अपंग आणि विकलांग विद्यार्थ्यांनाही नवतंत्राचा खूपच फायदा मिळू शकतो. आजच्या तरुणाईसाठी 'करिअर' हा शब्द अतिशय महत्त्वाचा ठरतो. या शब्दाचे ढोबळमानाने भाषांतर 'उपजीविकेसाठी केलेले काम किंवा व्यवसाय' असे होत असले तरी एखाद्याच्या एकंदर जीवनशैलीच्या आणि मुख्य म्हणजे जीवनपद्धतीच्या संदर्भात करिअर या शब्दाचे नव्हे, तर संकल्पनेचे वजन निश्चितच जास्त भरते. करिअर म्हणजे काय? घेतलेल्या शिक्षणाचे प्रतिबिंब त्यात कसे दिसते? मिळवलेला पैसा किंवा स्थान याचा संबंध काय? आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम केल्याने मिळणारे मानसिक समाधान किती मोलाचे असते हे आणि असे अनेक मुद्दे यावेळी विचारात घेतले जातात. मात्र व्यावहारिक पातळीवर पाहता केलेल्या कामातून मिळणारे उत्पन्न हाच निकष बहुसंख्य प्रकरणांमध्ये पाळलेला आढळतो. याच अर्थाने 'करिअर' या संकल्पनेचा विचार केला आणि जरा मागे वळून पाहिले तर गेल्या शतकात म्हणजे सन २००० च्या थोडे आधीपर्यंत इंजिनिअर होणे ही बहुतेकांची महत्त्वाकांक्षा असे, असे म्हणता येईल. परंतु एकविसाव्या शतकाची सुरूवातच सर्वांचे जीवन व्यापणाऱ्या संगणक आणि संगणकाधारित प्रणालींनी झाली आणि इच्छुकांना करिअर करण्यासाठी सापडलेला नवा पैलू, नवे क्षेत्र म्हणजे कॉंप्युटर.

कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन आणि या तिघांचे त्रिकूट जमल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. खाजगी, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रांबरोबरच गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये सरकारी विभागही संगणकीय सेवासुविधांवर चालू लागल्याने आणि त्या पुरवूही लागल्याने माहिती तंत्रज्ञान उर्फ 'आयटी सेक्टर'मध्ये प्रचंड मनुष्यबळाची आवश्यकता भासली. इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर सोडाच, तुलनेने अगदीच प्राथमिक पातळीवरचे संगणकीय अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्यांनाही थोड्याफार उमेदवारीनंतर नोकऱ्या सहज मिळत राहिल्या. महत्त्वाचे म्हणजे (करिअरच्या इतर पारंपरिक पर्यायांच्या मानाने) आयटीमध्ये बहुतेक सर्वांनाच अगदी सुरूवातीपासूनच भरपूर पगार मिळू लागला. पगाराला 'पॅकेज' असे संबोधण्याची लाटही बहुधा आयटीमधूनच उगम पावली. परिणामी, करिअर म्हणजे आयटी असे नवे समीकरण प्रस्थापित झाले. अर्थात या गोष्टीलाही आता पंधरा-वीस वर्षे झाली आहेत. या गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये 'चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट थिंग' म्हणजेच 'बदल हीच सर्वात शाश्वत बाब आहे' या वाक्प्रचाराचा विसर पडू लागला. खरे तर संगणकीय विश्व इतक्या झपाट्याने बदलत आले आहे की, जुने तंत्रज्ञान किंवा पद्धती कालबाह्य होण्याचा वेग ('रोलओव्हर पीरिअड') इथे सर्वाधिक आहे. काही बाबतीत तर अक्षरशः गेल्या महिन्यातल्या प्रणालीची जागा या महिन्यात हाती आलेले नवतंत्रज्ञान घेते आहे. अर्थात इतके क्रांतिकारी बदल अत्युच्च पातळीवरच होत असले तरी कधी ना कधी शेवटच्या स्तरापर्यंत झिरपतात. त्यामुळेच आता संगणक साक्षरता ही कायम सुरू असणारी बाब बनली आहे.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# हातातोंडाशी आलेला घास जमीनदोस्त

**वैभव पाटील**



दिवसा प्रखर उष्णता आणि सायंकाळी पावसाचे आगमन यामुळे बळीराजा पुरता हैराण झाला आहे. भात शेतीच्या लोंब्यांचा दाणा तयार झाला असून काही ठिकाणी भात कापणी सुरु केली आहे. कारण उन्हाच्या तिव्रतेने लोंब्यातून दाणा अलग होत असून कापणी केली नाहीतर हाताला दाणा मिळणार नाही. याच विचारांतून भात कापणी सुरु केली आहे. दिवाळी सण आधी बहुतांशी ठिकाणी भात कापणी सुरुवात झाली आहे. मात्र आता परतीच्या पावसाने बळीराजांस मोठ्या संकटात पाडलेले आहे. भात कापणी करावी की नाही हेच विचार त्यांस स्वस्त बसू देत नाही. त्यास बरोबर दुपारी रणरणत्या उन्हाची दाहकता वाढली असून भात कापणींस मजूर मिळणे कठीण झाले आहे.

ऐन दिवाळीच्या तोंडावर परतीच्या पावसाच्या धारा धो-धो कोसळल्या सोसाट्याच्या वारा आणि विजांचा कडकडाट त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पिकलेले भाताची नासाडी झाली. ऐन दिवाळीच्या तोंडावर आणि भात कापणीच्या वेळेवरच पाऊस झाल्याने खूप मोठ्या प्रमाणावर बळीराजाचे नुकसान झाले आहे. बळीराजाची दिवाळी पहाट ही आपल्या शेतातील धान वाचविण्यासाठी प्रयत्न करत आहे. बळीराजाचं नातं हे थेट शेतातील धानाच्या पिकांमध्ये आहे त्याच्या कुटुंबियांची मुलाबाळांची आनंदाची दिवाळी ही शेतात पावसाच्या भीतीपोटी उरले सुरलेले भात गोळा करण्यात गेली. तसेच पावसाची विश्रांती मिळताच पदरात पाडून घेण्यासाठी मेहनतीने प्रयत्न करत असताना दिसून येत आहे. परतीच्या पावसामुळे दाणेदार कणस मोत्यासारखे धान जमीनदोस्त झाल्याने हातातोंडांशी आलेला घास निसर्गाच्या कोपामुळे हिरावून जाण्याच्या मार्गावर असल्यामुळे शेतकरी वर्गात मोठे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे तर युवा पिढीचा शेती करण्यासाठी प्रयत्न यावर येत असलेल्या संकट यानेच खचून गेला आहे. बळीराजाची दिवाळी पुन्हा एकदा शेतातच सुरू झाली असून, परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः रायगड आणि कोकणासह अनेक भागांत विखुरलेल्या परतीच्या पावसाने कापणीसाठी तयार ठेवलेले धान भिजून चिखलात बसले आहे. त्यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेण्याची शक्यता नाही तर एकूणच हिरावला गेला आहे. पाऊस नेमक्याच दिवाळीच्या तोंडावर वादळ वाऱ्यासह पडला. त्यामुळे शेतातील पीक पूर्णतः झोपले तर काहीनी कापणी केलेले आणि ठेवलेले भाताचे गठ्ठे पुन्हा भिजले, पाणी साचल्याने पिक घटण्याची शक्यता आहे. यावर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाला त्यामुळे उन्हाळी पिके देखील त्या मोसमी पावसाने नासवली तरी देखील ताट मानेने पुन्हा खरीपाच्या लागवडीसाठी सज्ज होऊन नव्याने लागवड केली त्यावर देखील अनेक प्रकारचे संकट आले आणि त्यातून उरलेसुरले पीक यावर आता परतीच्या पावसामुळे शेतकरी राजा चिंतेत सापडला आहे. परतीच्या पाऊस शांत झाला असे वाटत असताना शिवाय भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार झाला असून आणि प्रखर उन्हाच्या उष्णतेने भातापासून दाणा अलग होत असल्यामुळे आम्ही शेतकरी वर्गांनी भात कापणी केली. मात्र आता परतीच्या पाऊसाने धुमाकूळ घातल्यामुळे भात शेती पाण्याखाली गेल्याने शेतकरी चिंताग्रस्त अवस्थेत सापडला असून परतीच्या पावसाने शांती घ्यावी अशी सर्व शेतकरी देवाला साकडे घालत आहेत.

लक्ष्मी पूजनाच्या दिवशी संध्याकाळी वादळी वाऱ्यासह बरसलेल्या पावसाने पिवळ्या सोन्यासारखी भाताच्या कणसांनी बहरलेली उभी भातशेती शेतातील चिखलात झोपवली. यंदा वर्षातील पाच महिन्यांहून अधिक बरसात करणाऱ्या पावसामुळे आधीच हलवार पिकांचे नुकसान झेलणाऱ्या शेतकऱ्यांना वारंवार येणाऱ्या आस्मानी संकटामुळे चिंतेने ग्रासले आहे.

यामध्ये कमी दिवसांचे हलवार पीक हंगामातील आपल्या वेळेत पूर्णपणे पिकून काढणीला आला होता. मात्र लांबलेल्या पावसाने या हलवार पिकांची नासधूस केली. तर कापणी केल्यानंतर शेतात सुकविण्यासाठी पसरलेली भात पिके भिजून गेल्याने नुकसान झाले आहे. यंदा पावसाचे सावट काही केल्या कमी होण्याचे नाव घेत नाही अधूनमधून अवकाळी पाऊस सुरूच आहे. त्याचा मोठा परिणाम भात शेतीवर होऊ लागला आहे. जर पावसाचे सत्र असेच सुरू राहिले तर जगाच्या पोशिंद्याला एखाद्या अन्नछत्राच्या रांगेत उभं राहावं लागेल.

लोकसंसद

## भारताच्या डिजिटल पेमेंट प्रणालीचा चढता आलेख!




२०२५ या वर्षात भारताच्या डिजिटल क्रांतीने नवीन उंची गाठली असून युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस प्रणाली यामध्ये सर्वात आघाडीवर आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार बाजारात 'फोन पे' ४५.६ टक्क्यांसह प्रथम स्थानावर आहे. त्यानंतर 'गुगल पे' ३४.८ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. 'पेटीएम' ७.१ टक्के, 'नवी' २.७ टक्के आणि 'क्रेड', 'ॲमेझॉन पे' आणि 'भीम'(एकत्रित ९.५ टक्के) असा सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत इतर यूपीआय कंपन्यांचा हिस्सा आहे. गेल्या काही वर्षांत यूपीआय प्रणाली भारताच्या कॅशलेस अर्थव्यवस्थेचा कणा बनली असून या प्रणालीने भारतातील पेमेंट पद्धतीचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. अगदी चहाच्या स्टॉलपासून ते मोठ्या मॉलमधील लक्झरी शोरूमपर्यंत यूपीआयच्या माध्यमातून अत्यंत विश्वासाने एका क्षणात पेमेंट केले जाते. यूपीआय पेमेंटवरील वाढत्या विश्वासामुळे देशातील एकूण यूपीआय व्यवहार मूल्य २४.९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेली, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कौतुक केलेली भारताची विश्वासपूर्ण आणि विश्वासार्ह यूपीआयची सेवा आता सिंगापूर, फ्रान्स, यूएई, कतार, नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस आणि भूतान या आठ देशात सुरू झाली आहे. येणाऱ्या काळात जागतिक पातळीवर ही सहज सुलभ डिजिटल पेमेंट सेवा अधिक देशांत पोहोचेल अशी आशा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा शिवाजी पार्कवर झाला

शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा हा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी मुंबईतील शिवाजी पार्क (शिवतीर्थ) मैदानावर भरला होता. तो दिवस आणि तो मेळावा शिवसेना तसेच महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात खूप महत्त्वाचा ठरला. १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केली आणि त्यानंतर फक्त चार महिन्यांत पहिला दसरा मेळावा भरवण्यात आला. व्यासपीठावरून बाळासाहेबांनी आपले वडील प्रबोधनकार ठाकरे यांच्या लढाऊ विचारांना उजाळा दिला. 'मराठी माणसाने उभं रहायला हवं, स्वतःच्या हक्कासाठी लढायला हवं' हा संदेश त्यांनी दिला. त्या पहिल्या मेळाव्यात बाळासाहेबांनी 'मुंबईत मराठी माणसाला नोकरी मिळाली पाहिजे' हा मुद्दा सर्वात ठळकपणे मांडला. यामुळेच पुढे शिवसेनेचा 'मराठी माणसाचा हक्क' हा मुख्य धागा ठरला. बाळासाहेब ठाकरे यांचे व्यंग, कार्टूनधर्मी मांडणी, थेट भाष्य करणारी शैली या पहिल्याच मेळाव्यात प्रकट झाली. त्यांच्या उपरोधिक वाक्यांनी आणि थेट टोमण्यांनी श्रोत्यांवर छाप पाडली. हजारोंच्या संख्येने लोक शिवतीर्थावर जमले होते. मुंबईत मराठी माणसाचे स्थान आणि भविष्य याबाबतची अस्वस्थता त्या गर्दीतून स्पष्ट दिसत होती. या पहिल्या मेळाव्यामुळे शिवसेनेच्या राजकीय प्रवासाची औपचारिक सुरुवात झाली. 'दसरा मेळावा म्हणजे ठाकरेंच्या शिवसेनेचे शक्तीप्रदर्शन' ही परंपरा त्याच दिवशी निर्माण झाली. हा फक्त पक्षाचा मेळावा नव्हता, तर मराठी माणसाच्या आत्मसन्मानाचा आवाज होता. पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेला जे महत्त्वाचे स्थान मिळाले त्याची बीजे इथे रोवली गेली. हा पहिला मेळावा म्हणजे एका नव्या राजकीय शक्तीचा जन्म होता. बाळासाहेबांच्या विचारांची, नेतृत्वशैलीची आणि मराठी अस्मितेच्या आंदोलनाची ही सुरुवात होती. पहिल्या मेळाव्याने मराठी युवकांना रोजगार आणि न्याय मिळावा, मुंबई ही महाराष्ट्राचीच राजधानी राहावी, अशा ठाम मागण्यांचा आवाज दिला. ७०-८० च्या दशकात या व्यासपीठावरून काँग्रेस, डावे विचार व बाहेरून आलेल्या मजुरांविरोधात रोखठोक भाष्य झाले. 'मराठी माणूस' हा त्याकाळचा केंद्रबिंदू ठरला. १९९० नंतर शिवसेना-भाजप युती तसेच राममंदिर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दसरा मेळावा राष्ट्रीय स्तरावर झळकला. 'गर्वसे कहो हम हिंदू है' हा घोष या व्यासपीठावरून दुमदुमला. १९९५ मध्ये युती सरकार स्थापल्यानंतर हा मेळावा सत्ता आणि जबाबदारी यांचा अहवाल देणारा कार्यक्रम ठरला. शेवटच्या दशकात बाळासाहेबांची तब्येत ढासळली. तरीही भ्रष्टाचारविरोधी इशारे, मत न विकण्याचा आदेश आणि हिंदुत्वाशी प्रामाणिक राहण्याचा आग्रह त्यांनी व्यक्त केला. २०१२ मध्ये बाळासाहेबांचा काळाच्या पडद्याआड जाण्यापूर्वीचा अखेरचा मेळावा भावनिक ठरला; रेकॉर्डेड संदेशातून 'उद्धव आणि आदित्यची काळजी घ्या' अशी हाक देत त्यांनी एक युग संपवले. पूर्वी बाळासाहेब ठाकरे यांचं भाषण ऐकण्यासाठी शिवाजी पार्क मैदानावर हजारो शिवसैनिकांची गर्दी होत असे. त्या दिवशी आधी शस्त्रपूजन करून नेत्यांच्या भाषणाला सुरुवात व्हायची. सर्वात शेवटी बाळासाहेब ठाकरे यांचं भाषण व्हायचं. 'शिवसेनेने १९८९ मध्ये 'सामना' हे वर्तमानपत्र सुरू केलं. शिवसेनेची भूमिका ही दसरा मेळाव्यात स्पष्ट केली जात असे. याचं उदाहरण म्हणजे, १९९१ सालच्या दसरा मेळाव्यात भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना मुंबईत होऊ देणार नाही, असं बाळासाहेबांनी जाहीर केलं. तेव्हा तो कसा होऊ देणार नाही याचं कोणतंही नियोजन नव्हतं. 'दसरा मेळाव्यात पक्षाच्या भूमिकेला रुपरेखा देण्याची ही परंपरा उद्धव ठाकरे यांच्या काळतही कायम आहे. शिनसेनेमधल्या अनेक महत्त्वाच्या घटना दसरा मेळाव्यात घडल्या आहेत म्हणून शिवसेनेत दसरा मेळाव्याला विशेष महत्त्व आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
**३० ऑक्टोबर**
१) श्री.दिलीप श्रद्धानंद म्हात्रे
अलिबाग, ३०-१०-१९५२

## पर्यटकांची कोकणाला पसंती

**गणपतीपुळे :** दिवाळी पर्यटन हंगामात पर्यठकांची कोकणाला पसंती मिळत आहे. कोकणातील सुंदर समुद्र किनाऱ्यांवर पर्यटक मोठी गर्दी करत आहेत. गणपतीपुळे येथे गेल्या चार दिवसांत विविध ठिकाणांहून आलेले लाखो पर्यटक-भाविकांनी गणपतीपुळे येथील स्वयंभू श्रींचे दर्शन घेऊन पर्यटनाचा आनंद घेतला. सध्या शाळा-महाविद्यालयांना दिवाळी सुट्टी असल्याने पर्यटकांची पावले पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी कोकणाकडे वळू लागली आहेत. कोकणातील निसर्गरम्य ठिकाणे पर्यटकांना आकर्षित करत आहे. गणपतीपुळे हे जागतिक दर्जाचे पर्यटन असल्याने पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, गर्दीमुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळत आहे.

# आपला दवाखाना योजनेचा बोजवारा

## • ठाण्यातील आरोग्यसेवेवर मोठा प्रश्नचिन्ह; कर्मचाऱ्यांचा पगारही रखडला




**। ठाणे । प्रतिनिधी ।**

नागरिकांना त्यांच्या घराजवळ मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने सुरू केलेली महत्त्वाकांक्षी 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजना आता कोलमडली आहे. एकेकाळी नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी उचलणारी ही केंद्रे आता बंद पडल्याने, ठाण्यातील आरोग्यसेवेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महापालिकेने शहरभर सुरू केलेल्या ५० केंद्रांपैकी तब्बल ४० दवाखाने बंद झाले असून, काही ठिकाणी या बंद केंद्रांचे रूपांतर व्यापारी आस्थापनांत झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एका ठिकाणी तर दवाखान्याचे साडीच्या दुकानात रूपांतर झाल्याने नागरिक आणि राजकीय वर्तुळात संतापाची लाट उसळली आहे.

ठाण्याची लोकसंख्या तब्बल २६ लाखांवर पोहोचली असून, त्यातील ५२ टक्क्यांहून अधिक नागरिक झोपडपट्ट्यांमध्ये आणि चाळी त राहतात. आरोग्य नियमांनुसार, दर ३० ते ४० हजार लोकसंख्येमागे एक आरोग्य केंद्र आवश्यक असते. मात्र, सध्या ठाण्यात एक आरोग्य केंद्र दीड लाख लोकांची सेवा करत आहे.

या योजनेचा करार ऑक्टोबर २०२५ पर्यंत असतानाही, ऑगस्ट महिन्यातच सर्व केंद्रे अचानक बंद करण्यात आली. कर्मचाऱ्यांना मागील ६ महिन्यांपासून पगार मिळालेला नाही, अशी माहिती समोर आली आहे. परिणामी, सणासुदीच्या काळात अनेक कर्मचाऱ्यांना बेरोजगारी आणि आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आ. संजय केळकर यांच्या उपस्थितीत जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात नागरिक आणि माजी कर्मचाऱ्यांनी आपली व्यथा मांडली.

परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या गैरव्यवस्थापनाचा पर्दाफाश करत तातडीने हस्तक्षेपाची मागणी केली. ठाणे महानगरपालिकेच्या धोरणांवर थेट टीका करताना सांगितले, महापालिका ही प्रयोगशाळा नाही की इच्छेनुसार योजना सुरू आणि बंद केल्या जातील. नागरिकांना प्रतीकात्मक नव्हे तर स्थिर आणि विश्वासार्ह आरोग्यव्यवस्था हवी आहे. ते पुढे म्हणाले, काही ठिकाणी बंद दवाखान्यांचे व्यापारी आस्थापनात रूपांतर झाले आहे. एका ठिकाणी तर साडीचे दुकान सुरू झाले आहे. प्रशासनाने तत्काळ कारवाई केली नाही, तर ही जागा कायमस्वरूपी खासगी स्वार्थाच्या ताब्यात जाऊ शकते.

### महापालिकेचे मौन कायम

या सर्व घडामोडींवर ठाणे महानगरपालिकेकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण आलेले नाही. 'आपला दवाखाना' योजनेचे भवितव्य, कर्मचाऱ्यांचे थकित वेतन आणि आरोग्यसेवा पुन्हा सुरू होणार का? या सर्व प्रश्नांची उत्तरे नागरिकांना अजूनही मिळालेली नाहीत. दरम्यान, ठाण्यातील नागरिकांकडून या योजनेच्या पुनरुज्जीवनाची आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची जोरदार मागणी केली जात आहे.

## घरकुल ते वास्तुविहार बस सुरु करण्याची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर सेक्टर १५ ते १८ परिसरातील नागरिकांना खारघर रेल्वे स्थानक गाठण्यासाठी बस क्रमांक ५३ व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची वाहतूक सुविधा नसल्यामुळे गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे खारघर रेल्वे स्थानक ते वस्तूविहार या मार्गावर नवीन बस सुरू करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन नंदू वारुंगसे यांनी आगार व्यवस्थापनाला दिले आहे.

खारघर सेक्टर १५ ते १७ मध्ये जवळपास चार हजार नागरिक वास्तव्य करीत आहे. शिवाय या परिसरात चार शाळा आहेत. या भागात नवी मुंबई परिवहन विभागाकडून एनएमएमटीची ५३ क्रमांकाची एकमेव बस सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे इतर कोणताही पर्याय नसल्याने नागरिकांना पायी जावे लागते. तर खारघर टोल नाका येथील बस थांबा गाठावे लागते. तसेच ५० ते ६० रुपये भाडे देऊन खारघर रेल्वे स्थानक गाठावे लागत असल्यामुळे वारुंगसे यांनी तुर्भे आगारचे व्यवस्थापक सुनील जगताप यांची भेट घेऊन येथील मार्गावर नवीन बस सुरू करण्याची मागणी केली आहे.

## औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणाचा विळखा



**। बोईसर । प्रतिनिधी ।**

तारापूर औद्योगिक क्षेत्र प्रदूषणाच्या जाळ्यात अडकले असून, अनेक उद्योगांकडून होणाऱ्या वायू प्रदूषणाने नागरिकांचा श्वास गुदमरू लागला आहे. प्रशासन आणि आरटीओ विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. परिसरात दररोज ट्रेलर, कंटेनरद्वारे प्रचंड वाहतूक केली जाते. या वाहनांमधून निघणाऱ्या धुरामुळे रस्त्यावर चालणाऱ्या लोकांना डोळ्यांत जळजळ, श्वासोच्छवासास त्रास अशा समस्या भेडसावत आहेत. नागरिकांच्या मते, या वाहनांमधून केवळ धुराचे प्रदूषणच होत नाही, तर वाहतुकी दरम्यान ओव्हरलोड माल वाहून वाहतूक नियमांचीही पायमल्ली केली जात आहे. अनेक ट्रेलरमध्ये वजन मर्यादेपेक्षा दुप्पट माल भरला जातो, ज्यामुळे रस्त्यांची दुरवस्था होते आणि अपघाताचा धोका वाढतो. तरीही आरटीओ विभागाकडून एकही ठोस कारवाई केली जात नाही.

तारापूर एमआयडीसी परिसरात एका कंपनीचे तब्बल नऊ प्लांट सुरू आहेत. या प्लांटमधून दररोज शेकडो ट्रेलर बाहेर पडतात आणि याच वाहनांकडून होणारे प्रदूषण सर्वाधिक असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. धूर आणि धुळीच्या या विषारी वातावरणामुळे नागरिकांना त्रास होत असून, परिसरात रोगराई वाढत आहे. यावर नियंत्रण ठेवण्याऐवजी संबंधित अधिकारी हातावर हात धरून बसल्याचे चित्र आहे. काही स्थानिकांच्या मते, संबधीताच्या संगनमतामुळे कारवाई थांबली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वारंवार सूचना देण्यात आल्या असल्या तरी त्या फक्त कागदावरच दिसतात. वायू, ध्वनी आणि वाहन प्रदूषणाचे सर्व नियम उद्योगांकडून उघडपणे धाब्यावर बसवले जात आहेत. बोईसर, तारापूर परिसरात एवढ्या वर्षांपासून सुरू असलेला औद्योगिक कंपन्या व वाहतूक प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत आहे. तारापूर परिसरातील पर्यावरण वाचवण्यासाठी प्रशासनाने आता तरी जागे होणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## लांज्यात त्रिपुरारी पौर्णिमाचे आयोजन

**लांजा :** तालुक्यातील रुण येथील श्री अचलेश्वर व श्री भैरी देवांचा त्रिपुरारी पौर्णिमा उत्सव दिनांक ५ नोव्हेंबर रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. रुण गावचे ग्रामदैवत श्री देव अचलेश्वर आणि श्री भैरी देवांचा त्रिपुराई पौर्णिमा उत्सवानिमित्त (दि. ५) नोव्हेंबर रोजी त्रिपुरोत्सव सोहळा साजरा करण्यात येईल. रात्री माऊली महिला नमन मंडळ, रत्नागिरी यांचे रत्नागिरी जिल्ह्यातील पहिले महिलांनी सादर केलेली चौरंगी नमनाचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

## तळोजा गावात भटक्या कुत्र्याची दहशत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा गावात भटक्या कुत्र्याने अक्षरशः दहशत माजवत अवघ्या २० मिनिटांच्या कालावधीत पाच जणांवर हल्ला चढवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात चार लहान मुलाज्ञसह एकूण पाच जण गंभीर जखमी झाले असून यातील दोन लहान मुलाची प्रकृती चिंताजनक आहे. वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. हा धक्कादायक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे तळोजा गावातील पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. भटक्या कुत्र्याने लहान मुलांवर हल्ला केलेल्या परिसरात शाळा आणि धार्मिक स्थळे असल्यामुळे त्या भागात नेहमी मुलांची व नागरीकांची गर्दी असते. त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या मुलांच्या कुटुंबियांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे गावात फिरणे धोकादायक झाल्याचे येथील रहिवाशांचे म्हणणे

## कंटेनरची तीन वाहनांना धडक

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर भोस्ते घाटाच्या पायथ्याशी वेरळ गावाजवळ मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव कंटेनरने तीन चारचाकी वाहनांना आणि एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मोटारमधून प्रवास करणारे दोघेजण जखमी झाले आहेत. हा अपघ-ात मंगळवारी (दि.२८) रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास झाला. खेड तालुक्यातील वेरळ येथे गेली अनेक वर्षे महामार्गाचे काम अर्धवट स्थितीत आहे. त्यामुळे या ठिकाणी नेहमी धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरू आहे. मुंबई-गोवा महामार्ग हा अपूर्ण अवस्थेत असल्याने महामार्गावर अनेक ठिकाणी हीच परिस्थिती पाहावयास मिळत आहे. महामार्गावरील या ठिकाणी यापूर्वीदेखील छोटे-मोठे अनेक अपघात झाले आहेत. तरीदेखील अद्याप महामार्ग विभागाकडून या रस्त्याचे काम पूर्णत्वास नेले जात नसल्याचे दिसून येत आहे. याच अपूर्ण कामाचा फटका पुन्हा एकदा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना सोसावा लागला आहे. मुंबईहून गोव्याच्या दिशेने भरधाव वेगात जाणारा कंटेनर हा भोस्ते घाट उतरून आल्यानंतर वेरळ गावातील महामार्गावरील डायव्हर्शन येथे आला असता, सर्वप्रथम पुढे असलेल्या मोटारीला पाठीमागून धडक दिली. या धडकेमुळे या मोटार पुढे असलेल्या दुचाकीला पाठीमागून धडकली. तसेच यावेळी समोरून येणाऱ्या पिकअपला कंटेनरने धडक दिली आणि मुंबईच्या दिशेने गेला.

## मासेमारी नौका किनाऱ्याच्या आश्रयाला

**। दापोली । प्रतिनिधी ।**



कोकण किनारपट्टीवर पुन्हा एकदा वादळाचे सावट दाटले असून, जोरदार वाऱ्यांमुळे आणि उंच लाटांमुळे खोल समुद्रात जाणाऱ्या हजारो मासेमारी नौका आता किनाऱ्याच्या आश्रयाला उभ्या आहेत. परिणामी संपूर्ण मासेमारी उद्योग ठप्प झाला असून, रोजची कोट्यवधी रुपयांची उलाढाल थांबली आहे. किनारपट्टीचे अर्थकारण अक्षरशः डळमळीत झाले आहे. महाराष्ट्रासुमारे ७२० कि. मी. लांबीची समुद्रकिनारीपट्टी लाभली असून, त्यावर सुमारे १७ हजार मासेमारी बोटी नोंदणीकृत आहेत. यापैकी १३ हजार बोटी या यंत्रसंचालित आहेत. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यातील किनारे मासेमारीसाठी प्रसिद्ध आहेत.

हर्णे, आंजर्ले, बुरोंडी, मुरूड, पाज, देवगड, विजयदुर्ग या किनाऱ्यांवर हजारो नौका ठप्प आहेत. समुद्रकिनारे बोटींच्या गर्दीने गजबजले असले तरी वातावरणात भीतीचे सावट पसरले आहे. मच्छिमार, चालक, कामगार आणि व्यापाराशी निगडित हजारो हात सध्या बेरोजगार झाले आहेत. मासेमारी बंद असल्याने बाजारात मासळीचा पुरवठा घटला आहे. परिणामी स्थानिक बाजारात मासळीचे दर चढण्याची शक्यता आहे. बर्फ कारखाने, कोल्ड स्टोरेज, वाहतूकदार आणि प्रक्रिया उद्योग यांच्यावरही मंदीचे सावट आले आहे. प्रशासनाने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला असून, हवामान विभागाने वादळाचा इशारा कायम ठेवला आहे. हवामान स्थिर झाल्यावरच मासेमारी पुन्हा सुरू होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, किनाऱ्यावर ठप्प झालेल्या बोटींचे दृश्य पाहून कोकणातील अर्थकारणाला बसलेला झटका स्पष्ट जाणवतो आहे.

## रोटरी घनदाट जंगलांना सीएसआर फंडाची मदत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा औद्योगिक क्षेत्रात असलेल्या व विविध ठिकाणी सीएसआर फंडाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत मदत करणार्या विस्टा प्रोसेसेड फुडस्ने रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या महत्वाकांक्षी प्रकल्प रोटरी घनदाट जंगलांना १० लाखाचा सीएसआर फंड जाहीर केला आहे.

पनवेलकर नागरिकांच्या लोकसहभागाद्वारे पनवेल महानगर पालिका व रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल च्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या घनदाट जंगल प्रकल्पास तीन वर्षे पूर्ण झाली आहेत त्या अनुषंगाने प्रकल्पाचा तिसरा वर्धापन साजरा करण्यात आला. सदर भुपेंदर सिंग, चंद्रशेखर सोमण, डॉ. गिरीश गुणे, माजी आ. बाळाराम पाटील, पनवेल महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त विधाते, रुपाली माने, संतोष मराठे, नितीन ढमाले, चारू श्रोत्री उपस्थित होते.

**पर्यटनासाठी गेलेल्यांची माघारी परतण्यास सुरुवात**
**अनेक वाहन चालकांनी विरुद्ध दिशेने प्रवास**

## अहमदाबाद महामार्गावरील कोंडीचा प्रश्न गंभीर

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, दिवाळीच्या सुट्ट्या संपवून परतीच्या प्रवासातील वाहनांमुळे महामार्गावर रविवारी रात्री मोठी कोंडी निर्माण झाली होती. सातिवली उड्डाणपूल परिसरात तब्बल ९ तास ही कोंडी होती. पहाटे ही कोंडी हटवण्यात वाहतूक पोलिसांना यश आले. सातिवली येथील निर्माणाधीन उड्डाणपुलाच्या मुंबई बाजूकडील जोड रस्त्यावरील खड्ड्यांमुळे रविवारी रात्री मोठी वाहतूक कोंडी झाली होती. मुंबई वहिनीवर तीन ते चार किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूक कोंडीला कंटाळून गुजरात वहिनीवरुन विरुद्ध दिशेने आलेल्या



कार आणि अन्य वाहनांमुळे गुजरात वाहिनीवरही वाहतूक कोंडी झाली होती. सोमवारी पहाटे पाच वाजता वाहतूक कोंडी सोडवण्यात महामार्ग सुरक्षा विभागाच्या पोलिसांना यश आले.

दोन दिवसांपासून पालघर तालुक्याच्या पूर्व भागात पाऊस सुरु असल्यामुळे महामार्गावरील सातिवली येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही दोन्ही बाजू कडील जोड रस्त्यांची खड्ड्यांमुळे चाळण झाली आहे. रविवारी दिवाळीच्या सुट्ट्या संपल्याने पर्यटनासाठी बाहेरगावी गेलेल्यांची माघारी परतण्यासाठी सुरुवात झाली होती.

सातिवली उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजू कडील जोड रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमी होतो, अशात वाहनांची संख्या वाढल्याने रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. वाहतूक कोंडीतुन मार्ग काढण्यासाठी अनेक वाहन चालकांनी विरुद्ध दिशेने वाहने आणल्यामुळे गुजरात वहिनीवरही वाहतूक कोंडी झाली होती.

रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास महामार्ग सुरक्षा विभागाचे पोलिसांनी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. विरुद्ध दिशेने आलेल्या वाहनांना बाजूला करून गुजरात वाहिनी वाहतूक संथगतीने सुरु केल्यानंतर मुंबई वाहिनीवरील वाहतूक कोंडी सोडवण्याला प्राधान्य दिले. सोमवार पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास वाहतूक कोंडी सोडवण्यात महामार्ग सुरक्षा विभागाच्या कर्मचाऱ्यांना यश आले.

### कामाची संथगती

उभारणीचे काम गेल्या वर्षभरापासून सुरु आहे. आजतागायत कामाची रखडपट्टी सुरूच आहे. उड्डाणपुलालगतचे अरुंद सर्व्हिस रोड आणि जोड रस्त्यावरील खड्ड्यांमुळे या वाहतूक कोंडीत मोठी भर पडत आहे. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात उड्डाणपूल वाहतूकीसाठी खुला करण्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नियोजन आहे. कामाची संथगती पाहता उड्डाणपुलावरून वाहतूक सुरु होण्यासाठी नवीन वर्ष उजाडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# निवडक



## राजकोट किल्ला पर्यटकांसाठी खुला

**मालवण :** छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असलेला व पर्यटकांचे आकर्षण असलेला ऐतिहासिक राजकोट किल्ला पालकमंत्री नितेश राणे यांच्या निर्देशानंतर मंगळवारपासून पर्यटकांसाठी पुन्हा खुला करण्यात आला. यामुळे दिवाळी सुट्टीमध्ये मालवणमध्ये आलेल्या पर्यटकांना तसेच स्थानिक पर्यटन व्यावसायिकांना दिलासा मिळाला. पुतळा व किल्ला परिसराच्या दुरुस्तीकामासाठी दोन दिवसांपूर्वी हा पुतळा व किल्ला पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला होता. यंदा दिवाळी सुट्टीत मालवणमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. मात्र, वादळी पावसामुळे व समुद्र खवळल्याने ऐतिहासिक किल्ले सिंधुदुर्ग, तसेच जलक्रीडा बंद आहेत. तर दोन दिवसांपूर्वी अचानक सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्तीच्या कारणास्तव राजकोट किल्ला पर्यटकांसाठी बंद केला. यामुळे पर्यटकांचा पुरता हिरमोड होत होता. शिवाय स्थानिक पर्यटन व्यावसायिकांनाही याचा फटका बसला होता. किल्ला खुला केल्यामुळे पर्यटक व स्थानिक पर्यटन व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.



## सुशांत-सोमनाथ यांचा सत्कार


**मुंबई :** कुणबी समाजोन्नती संघ मुंबईच्या नेतृत्वाखाली आयोजित आझाद मैदान येथे एल्गार मोर्चाला सहकार्य करणाऱ्या महाड तालुक्यातील टोळ गावचे भूमिपुत्र तथा विभग फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष सुशांत जाबरे आणि शिरगांवचे सोमनाथ ओझर्डे यांचा कुणबी समाजोन्नती मंडळ दासगांव गटाच्या वतीने फलंदार कॉलेज सभागृह वहूर येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रदीप लोखंडे, किरीट पेंढारी, विलास राक्षे, सुभाष लाले, सत्यवान यादव, धोंडीराम वाडकर, सदानंद मांडवकर, बीना पारधी, समीर रेवाळे, सुर्यकांत शिगवण,अंबाजी नाडकर, संतोष धारशे, जितेंद्र बैकर, विठ्ठल घरटकर, अशोक आंबेकर, रामा निर्मळ, राजेश मौले, निलेश अडखळे, उमेश कदम, प्रणाली पाष्टे, जान्हवी पेंढारी, सानिका मांडवकर, निशिगंधा गावडे, रसिका चिविलकर यांच्यासह दासगांव गट व ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ वहूर उपस्थित होते.

## मच्छिमाराला वाम माशाचा चावा

**भाईंदर :** उत्तन समुद्रकिनारी ४२ वर्षीय भोईर नामक मच्छिमाराच्या डाव्या हाताला वाम (ईल) या माशाने चावा घेत यांच्या मनगटाला गंभीर दुखापत केल्याची घटना काही ६ ऑक्टोबरला घडल्याचे समोर आले आहे. वामने घेतलेल्या चाव्यामुळे त्या मच्छीमारावर हात गमाविण्याची वेळ आली होती. मात्र त्यावर वेळीच उपचार झाल्याने त्याचा हात वाचविण्यात डॉक्टरांना यश आले असले तरी त्याच्या हातावर प्लास्टिक सर्जरी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. भोईर हे उत्तन समुद्रकिनारी खडकाळ जागेत ६ ऑक्टोबर रोजी मासेमारी करीत असताना त्यांनी पकडलेली वाम त्यांच्या हातातून निसटली. आणि तिने त्यांच्या डाव्या मनगटावर दोन वेळा चावा घेतला. यामुळे भोईर यांच्या मनगटावर गंभीर जखमा होऊन त्यातून मोठ्याप्रमाणावर रक्तस्राव होऊ लागला. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी होते. हि बाब त्यांच्या लक्षात येताच त्यांनी भोईर यांच्या अपघातग्रस्त हाताला तात्काळ घट्ट पट्टी बांधून रक्तस्त्राव थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यांच्या हातावर घरीच उपचार सुरु केला. मात्र भोईर यांच्या हाताला प्रचंड सूज येऊ लागल्याने त्यांना तब्बल १७ तासानंतर मीरारोडच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## संगमेश्वर टप्प्यातील कामाला विलंब

**संगमेश्वर :** मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वर टप्प्यातील चौपदरीकरणाला होणारा विलंब प्रवाशांच्या मुळावर येत आहे. हा त्रास लवकरात लवकर संपवा अन्यथा आंदोलन करू, असा इशारा संगमेश्वरवासीयांनी दिला आहे. मुंबई-गोवा महामार्ग आता नागरिकांसाठी भयाचा मार्ग ठरू लागला आहे. पावसाळा संपला तरीही या रस्त्याच्या दुर्दशेचे चक्र कायम आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे याकडे पूर्ण दुर्लक्ष दिसून येते. परिणामी, प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अठरा वर्षांपासून सुरू असलेले महामार्गाचे काम अद्याप पूर्णत्वाला गेलेले नाही. उलट नव्याने बनवलेल्या रस्त्यावरच ठिकठिकाणी तडे गेलेले आहेत तर काही भागात मोठे खड्डे तयार झालेले आहेत. दरवर्षी खड्डे भरून आणि मलमपट्टी करून कोट्यवधी रुपयांची बिले फाडली जातात; पण प्रत्यक्षात रस्ता जसाच्या तसा खड्डेमय आहे. त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत आहे. याकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.



## बांठिया हायस्कूलला आयएसओ मानांकन

**पनवेल :** नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया हायस्कूलला आयएसओ मानांकन नुकतेच मिळाले आहे. भौतिक सुविधांबरोबरच इतर अनेक सुधारणा या ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर गुणवत्ता वाढीसही जालना देण्यात आलेली आहे. प्राचार्य बी. एस .माळी यांच्या परिश्रमातून जिल्ह्यातील हे मानांकन मिळवलेली पहिली अनुदानित शाळा आहे. सुधागड एज्युकेशन सोसायटीची के. आ. बांठिया हायस्कूल आणि एन एन पालीवाला कनिष्ठ महाविद्यालयात एकूण चार हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांची शाळा म्हणून या शैक्षणिक संकुलाची ओळख आहे. नवीन पनवेल वसाहती बरोबरच आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणासाठी येतात. बी एस माळी यांनी मुख्याध्यापक झाल्यानंतर बांठिया हायस्कूलचे रुपडे पालटवले. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबरोबरच या ठिकाणच्या भौतिक सुविधांवरही भर दिला. माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून हायटेक एज्युकेशन सुद्धा या शाळेमध्ये सुरू झाले आहे. शाळेला नुकतेच आयएसओ मानांकन मिळाले आहे. संस्थेच्या अध्यक्षा गीता पालेरेचा यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक आणि इतर शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# निवडक

## दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**रसायनी :** मोहोपाडा येथे राहणाऱ्या बारा वर्ष वयाच्या दोन मुलींचे अपहरण झाले असून पालकांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सेबी रोड मोहपाडा येथे राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुली मोहोपाडा बाजारपेठ येथे गेल्या होत्या. परंतु त्या उशिरापर्यंत घरी परत न आल्याने पालकांनी नातेवाईक, मित्र मंडळी सर्वत्र शोध घेतला. परंतु काहीएक ठावठिकाणा मिळला नाही. त्या अल्पवयीन आहेत या गोष्टीचा फायदा घेवून त्यांस फुस लावुन अज्ञात इसमाने त्यांना पळवून नेल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## माजी विद्यार्थ्यांनी भरवली शाळा

**सुतारवाडी :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी च्या १९९४-१९९५. विद्यार्थ्यांनी (दि.२६) ऑक्टोबर रोजी एकत्र आले. यावेळी एकूण ३४ माझी विद्यार्थी एकत्र आले होते. यावेळी सुरुवातीला विद्यार्थ्यांनी वर्गाच्या गॅलरी पासून वर्गाच्या प्रवेशद्वारापर्यंत शिक्षकांचे फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर खेडेकर यांनी केले. यावेळी पांडुरंग शिगवण, हरिश्चंद्र महाडिक, हनुमंत काळे, सुरेश गायकवाड उपस्थिती होते.



## वन्य प्राण्यांकडून शेतीचे नुकसान

**तळा :** जंगलातील वन्य माकडे व रानटी डुकरांकडून भातशेतीचे नुकसान करण्यात येत असल्याने तालुक्यातील शेतकरी वर्गात वन्य प्राण्यांमुळे चिंतेचे वातावरण पसरले आहे. तालुक्यात शेतकऱ्यांनी केलेल्या भात शेतीचे वन्य माकडे व रानटी डूकरांकडून नासधूस केली जात असल्याने शेती करावी की नाही असा प्रश्न येथील शेतकऱ्यांना पडला आहे. तालुक्यातील स्थलांतरामुळे शेतीचे प्रमाणही कमी झाले आहे. तसेच परतीच्या पावसामुळे तालुक्यातील भातशेतीचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.अशा अनेक अडचणींचा सामना करून जे काही नागरिक शेती करतात ती शेती तयार झाल्यानंतर कापण्या आधीच वन्य प्राण्यांकडून त्याची नासधूस केली जाते. दिवसेंदिवस औद्योगिक विकास करण्याच्या नावाखाली झाडांची होत असलेली कत्तल तसेच जंगलात वणवे लागण्याचे वाढलेले प्रमाण यामुळे जंगल भागातील माकडे आता ग्रामीण व शहरी भागातील गावांमध्ये उतरल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. अंगणात वाळत ठेवलेले कडधान्य तसेच भाजीपाल्याची नासाडी करणे, यांसह काहीवेळा एखादं घराचा दरवाजा उघडा असल्यास घरात घुसून सामानाची नासधूस करणे माकडांच्या अशा करामतींमुळे नागरिक हैराण झाले आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी लावलेली भात शेती आता बहरू लागली आहे.

## महादेव पवार यांना पुरस्कार

**म्हसळा :** जेजुरी पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात २०२५ चा आदर्श शिक्षक शिक्षक पुरस्कार म्हसळा तालुक्यातील राजिप. शाळा चिखलप येथील महादेव तारू पवार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पवार यांनी म्हसळा तालुक्यातील पाष्टी, मांदाटने शाळेवर चांगल्या प्रकारे काम केले आह. त्यांनी शाळेच्या आवारात वेगवेगळी फळझाडे, भाजीपाला यांच्या परसबागा तयार करुन त्या भाज्या मध्यान पोषण आहारात वापर करुन विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न केला आह. या सर्व बाबींचा विचार करुन स्वप्नपूर्ती शिक्षण संस्था जेजुरी, जि. पुणे यांच्या तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. या कार्क्रमास देवदत्त नागे, मंगेश घोणे, ज्योती पवार आदी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३७०, ९८२२४६१७६१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549
- ''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- ऑफिस कामाकरीता अनुभवी अकाऊंटंट महिला/मुलगी पाहिजे. अनुभव २ ते ३ वर्षे शैक्षणिक पात्रता बी.कॉम टायपिंग व बेसिक कॉम्प्युटर पगार रू.१०,०००/- ते १२,०००/- संपर्क : मु.पो.झिराड, ता.अलिबाग जि.रायगड मोबा नं. ८९८३०९३३५३/८००७४८२२९८
- एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली तसेच ड्रायव्हर पाहिजे. ७०६६१३८३६८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पालीत खड्ड्यांसह धुरळ्याचा त्रास

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

खराब रस्त्यामुळे ऐन सणासुदीला व बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व खरेदीसाठी पालीत येणाऱ्या नागरिकांची खूप गैरसोय होत आहे. येथील जुने बस स्टॅन्ड ते बल्लाळेश्वर मंदिरापर्यंतच्या रस्त्याची अक्षरशः दैना झाली आहे. या ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडले आहे. तसेच पाली स्टेट बँक जवळ, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळी पर्यंतचा रस्ता, हटाळेश्वर मंदिर ते बस स्टॅन्ड, भोई आळी ते मिनिडोअर स्टॅड पर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळा, मराठा समाज हॉल ते तहसील कार्यालय, बल्लाळेश्वर नगर, धुंडीविनायक नगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता प्रचंड खराब झाला आहे.


- **भाविकासह वाहन चालक त्रस्त**
- **नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

गावातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडले आहेत. तब्बल २ ते ३ वेळा खडी व ग्रीट टाकून हे खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात आले आहेत. मात्र अवजड व डंपर वाहतुकीमुळे पुन्हा खड्ड्यांनी डोकंवर काढले आहे. शिवाय खड्ड्यात टाकलेली खडी व ग्रीट बाहेर येऊन खूप मोठ्या प्रमाणात धुरळा उडत आहे. मोटारसायकल घसरून अपघात देखील होत आहेत. त्यामुळे रोगापेक्षा इलाज भयानक असे म्हणण्याची वेळ पालीकरांवर आली आहे.

डंपर व अवजड वाहने गेल्याने खड्ड्यातील बारीक खडी रस्त्यावर पसरल्याने दुचाकी वाहने घसरतात. खड्डे व खडीमुळे पादचाऱ्यांना चालतांना कसरत करावी लागते. विद्यार्थी, महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. खड्ड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होत आहे. प्रत्येकजण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.

**धुळीवर पाण्याचा उतारा**

वारंवार धुरळा उडून तो रस्त्याशेजारील घरे व दुकानात जातो. त्यामुळे येथील प्रवाशी, नागरिक, व्यवसायिक व ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यावर उपाय म्हणून जुने बस स्थानक ते बल्लाळेश्वर मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर नगरपंचायतीतर्फे टँकरद्वारे पाणी मारण्यात येत आहे. मात्र त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो. काही काळ चिखल देखील होतो. तसेच उन्हाने पुन्हा रस्ता कोरडा झाल्यावर धरळा परत उडत आहे.



### उपाय कुचकामी

नगरपंचायतीतर्फे गणपतीमध्ये येथील खड्ड्यात तात्पुरत्या स्वरूपात बारीक खडी व चुरा टाकून खड्डे बुजविण्यात आले होते. त्यांनतर सिमेंट मिक्सर टाकून देखील रस्ते खड्डे मुक्त करण्यात आले होते. मात्र सतत डंपर व अवजड वाहनांची रेलचेल यामुळे खड्ड्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. आता तर हे खड्डे आणखी खोल व रुंद झाले आहेत.

> खड्ड्यांमुळे नागरीक व वाहन चालकांची वाताहत होत आहे. येथील नागरिकांसह येणारे भाविक देखील त्रस्त आहेत. काही ठिकाणचे रस्ते कित्येक वर्षे दुरुस्त देखील झाले नाहीत. याबरोबरच रस्त्यांच्या दोन्ही बाजूला अतिक्रमण देखील वाढले आहेत. सण-उत्सव काळात प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागते. स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाने या गंभीर गोष्टीकडे लक्ष देऊन रस्ते सुस्थितीत व चांगल्या दर्जाचे करावेत.
> –कपिल पाटील, नागरिक, पाली

> नागरिक व भाविकांच्या सोयीसाठी पालीतील रस्त्यांवरील खड्डे २ ते ३ वेळा बुजविण्यात आले होते. मात्र अतिवृष्टी व वाहनांची रेलचेल यामुळे पुन्हा खड्डे झाले आहेत. पुढील आठ दिवसांमध्ये रस्ते नूतनीकरणाचे काम करण्यात येईल. येथील नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.
> – सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष नगरपंचायत, पाली

# भागवत यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या ग्रंथ निवड समितीने २०२३ मध्ये प्रकाशित उत्तम, दर्जेदार ग्रंथांची यादी जाहीर केली आहे. या यादीत रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील लेखिका अरुणा भागवत यांची इसाप प्रकाशन, नांदेड यांनी प्रकाशित केलेली दोन पुस्तके निवडण्यात आली आहेत.

उत्तम साहित्य, सकारात्मक विचार करायला शिकविणारी आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत करणारी आयएसबीएन. नंबर असलेली पुस्तके वाचकांना मिळावीत, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्याच्या ख्यातनाम लेखिका भागवत यांची 'गुलाम' हा कथासंग्रह तसेच मजंतर मंतर छूफ हा बालकथासंग्रह ही २०२३ मध्ये प्रकाशित झालेली दोन पुस्तके निवडण्यात आली आहेत.

भागवत यांच्या यापूर्वीच्या दोन पुस्तकांना देखील महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ याच्या उत्कृष्ट वाड्मय निर्मिती पुरस्कार प्राप्त झाला आहे. २००६ यावर्षी या मलाडक्या मुलांनोफया पुस्तकास साने गुरुजी पुरस्कार व २०१३ यावर्षी आनंद फुलवू या पुस्तकाला भा.रा.भागवत पुरस्कार राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला.



अलिबाग तालुक्यातील वरसोली बंदरात कोळी बांधवांनी नौका शाकारल्या आहेत.
(छायाचित्र : समीर मालोदे)

# 'भात कापणी करताना काळजी घ्या'

**। तळा । प्रतिनिधी ।**

सध्या सर्वत्र भातशेती पिकून तयार झाली असल्याने भात कापणीचा हंगाम सुरू झाला आहे. मात्र भात कापणीच्या हंगामात विंचू दंशाच्या घटनेत देखील वाढ झाली आहे. यावर्षी परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. लांबलेल्या पावसामुळे भात कापणीला उशिरा सुरुवात झाली असून कधीही पाऊस कोसळत असल्यामुळे घाईघाईनेच भात कापणी केली जात आहे. परंतु भात कापणी करताना अनेकदा बेसावध असल्यामुळे विंचू दंशाचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे भात कापणी करताना नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यामध्ये शेतात काम करताना पायात गमबूट वापरणे, हातात रबरी हॅन्डग्लोज घालणे, डोक्यात टोपी घालणे यांसारख्या



उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागात बहुतांश वेळा विंचू दंश झाला तर त्याला सुरुवातीला मांत्रिकाकडे विष उतरविण्यासाठी नेण्यात येते मात्र यामुळे उशीर होऊन वेळप्रसंगी त्या रुग्णाच्या शरीरात विष पसरला जाऊन जीवितास धोका निर्माण होतो. त्यामुळे विंचू दंश झाल्यास रुग्णाला उपचारासाठी त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करावे जेणेकरून वेळेवर उपचार झाल्याने त्या रुग्णाचे प्राण वाचतील. असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे.

## मोहोपाडा उतारावरील रस्त्याचे डांबरीकरण

**रसायनी :** दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील रस्त्याचा उतारावर खडी बाहेर आल्याने रस्त्याची दुरावस्था झाली होती. रसायनी पाताळगंगा परिसराची मुख्य बाजारपेठ असणाऱ्या मोहोपाडा शहर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे चर्चेत होता. मोहोपाड्याहून दांड फाटा रस्त्यांची दुरावस्था झाल्याने गंभीर समस्या निर्माण झाली होती. राकेश खराडे यांनी पत्रकारांसमवेत सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देवून सदर रस्त्यांची परिस्थिती न सुधारल्यास पत्रकार रस्त्यावर उतरतील असा इशारा दिला होता. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने मोहोपाडा ते रिस रस्त्यातील बाहेर आलेले टोकदार दगडांवरुन डांबरीकरण केले. या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या रसायनी व आसपासच्या परिसरातील प्रवासी व नागरिकांनी पत्रकारांचे कौतुक केले.

# कोलिवली-नेवाळीत पाणीटंचाई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वाकस ग्रुप ग्रामपंचायतीमधील कोलीवली आणि नेवाळी या गावांना सध्या सुरु असलेल्या पावसाळयात देखील पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. मागील चार दिवसापासून ग्रामपंचायतसाठी पाणी सप्लाय करणारी मोटर जळाल्यामुळे चार दिवस पाणी नळाला आले नाही. त्यामुळे पाणी पिण्यासाठी येत नाही, ही समस्या लक्षात घेऊन समाजसेवक सचिन धुळे यांनी कोळिवली आणि नेवाळी गावांसाठी दिवसभरामध्ये चार टँकर पुरवून पाणी पिण्याची व्यवस्था केली.

नेरळ कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या वाकस ग्रामपंचायत मधील नेवाळी आणि कोलिवली या गावांमध्ये सध्या पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. जल मिशन योजना जेव्हा संपूर्ण तालुक्यामध्ये राबवण्यात येत असून त्या नळपाणी योजनेतून त्यावेळी या दोन गावांना यातून



वगळण्यात आले आहे. जलजीवन मिशनचे काम अपूर्ण असल्याने अनेक गावांना पाणी पिण्याची टंचाई भासत आहे. नऊ ते दहा महिने होऊन ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे सध्या तेथे असलेले प्रशासक यांच्या माध्यमातून सुरु असलेला कारभार हा जनतेच्या विरुद्ध सुरु आहे. परंतु या प्रशासकाच्या हलगर्जीपणामुळे स्थानिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. ग्रामपंचायतीमधील सचिन धुळे यांच्या माध्यमातून आम्हाला टँकरने पाणी पुरवले गेले. स्थानिक ग्रामस्थ हरेश सोनावले यांनी कोलिवली गावाच्या बाहेर बांधण्यात आलेली पाण्याची राजकी नादुरुस्त झाली असून देखील त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. त्यांचवेळी स्थानिकांच्या पाण्याबाबत सतत ओरड असून देखील प्रशासक यांना गावात जाण्यास वेळ मिळत नाही. ऐन पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याची गैरसोय सुरु असल्याने स्थानिक ग्रामस्थ संतप्त असून नवीन नळपाणी योजनेत या दोन्ही गावांचं समावेश करावा अशी मागणी सोनावले यांनी केली आहे.

# कांदळेपाडा ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

**। पेण । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत कांदळे हद्दितील कांदळेपाडा गावातील सार्वजनिक गटाराचे सांडपाणी जाण्याचा मार्ग बंद केल्याने सांडपाणी अर्ध्या गावामध्ये शिरले आहे. रस्त्यावर एक ते दिड फुट पाणी साचले असल्याने, कांदळेपाडा गावातील ग्रामस्थांना ये-जा करणे कठीण झाले आहे. परिणामी दुर्गंधीयुक्त पाण्याचा त्रास कांदळेपाडा ग्रामस्थांना होत आहे. त्यामुळे गावाचे आरोग्य धोक्यात आले आहे.



याबाबत ग्रामस्थांनी दिलेली माहिती अशी की, ५० ते ६० वर्षापासून कांदळेपाडा गावाच्या सांडपाण्याचा मार्ग हा ठरलेला असून त्या मार्गानेच सांडपाणी मुंबई-गोवा महामार्गाच्या मुख्य नाल्याला मिळतो. परंतु कांदळेपाडा गावातील सुनिल लांगी या माणसाने गटारामध्ये दगड, विटा, माती टाकून गटार बंद केले असून, त्यामुळे पाणी पुर्ण गावात शिरून रस्त्यावर आले आहे. रस्त्यावर पाणी आल्याने गावातील ग्रामस्थांना ये-जा करणे कठीण झाले असून या पाण्याला अतिशय घाणेरडी दुर्गंधी येत आहे. त्यामुळे रस्त्या शेजारील घरांमध्ये साथींच्या आजारांना सुरूवात झाली आहे. काही घरांना पुर्ण पाण्याने विळखा दिल्याने नागरिकांना घरातून निघनेही कठीण झाले आहे. याबाबत कांदळे ग्रामस्थांनी पेण तहसील, पेण पंचायत समिती, पेण प्रात्त कार्यालय तसेच वडखळ पोलीसठाण्यात दाद मागण्याचा प्रयत्न केला. परंतु संबंधित प्रशासकीय यंत्रणाने कांदळेपाडा ग्रामस्थांच्या निवेदनाला केराची टोपली दाखवली आहे. या बाबत प्रत्यक्ष भेटून सुनील लांगी यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सदरील गटार माझ्या जागेतून जातोय सदरील गटाराचे पाणी माझ्या घरात घेणार नाही.

# सेवानिवृत्त पाटबंधारे खात्यातील कर्मचाऱ्यांचा वर्धापनदिन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघ माणगाव यांच्यावतीने संघाचा अकरावा वर्धापनदिन मेळावा (दि.२८) ऑक्टोबर रोजी पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघ माणगाव अध्यक्ष नथुराम पाष्टे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या तसेच सदस्यांच्या उपस्थितीत कुणबी भवन,निजामपूर रोड,माणगाव येथे उत्साहात संपन्न झाला. या वर्धापन दिनानिमित्त संघातर्फे मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर मेळावा तसेच ७५ वर्ष वय झालेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास नथुराम पाष्टे, अप्पर कोषागार अधिकारी रायगड-अलिबाग देवेंद्र पाटील, सुरेश पालकर, काशिनाथ जाधव, सुनील तार, डॉ. संतोष जाधव आदींनी मार्गदर्शन केले.

## वीटभट्टी, सुकी मासळीवाले हवालदिल | पावसाचा मुक्काम तब्बल सहा महिने

# परतीच्या पावसाचा व्यवसायांना फटका

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**परतीच्या पावसाचा फटका जिल्ह्यातील भातशेती बरोबरच अनेक व्यवसायांना बसला आहे. यंदा मे महिन्यात पाऊस सुरु झाला आहे. आणि ऑक्टोबरच्या अखेरीसही तो मुसळधार कोसळत आहे. त्यामुळे या व्यवसायांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.**

पावसाळा लांबल्याने बांधकाम, विकासकामे करणारे, भात गिरणी, वीटभट्टी, कुंभारकाम, सुकी मासळी, मंडप व डेकोरेशन आदी व्यावसायिक हतबल झाले आहेत. त्यांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. लांबलेल्या पावसामुळे हे व्यवसाय अक्षरशः डबघाईला आले आहेत. शेतामध्ये भात पिक डोलू लागले होते. आणि तयार झालेला भात कापणीसाठी शेतकरी देखील सज्ज होते. या हंगामात शेतकरी कापणी करून भात गिरण्यांवर भात भरडण्यासाठी गर्दी करतात, मात्र, तयार झालेला भात शेतात पाण्यात आडवा पडल्यामुळे आता शेतकऱ्यांचे तर नुकसान झालेच, मात्र भात गिरणी व्यवसायाचे देखील नुकसान झाले आहे.

**कुंभारकाम व्यवसायावर पाणी**

पालीतील कुंभारकाम व्यवसायिक म्हणाले की परतीच्या पावसामुळे मडकी, चुली व मातीच्या इतर वस्तू



आणि मातीची खेळणी खराब झाल्या आहेत. शिवाय पाऊस आणि गारवा असल्याने मडकी व चुलींची विक्री देखील थांबली आहे. शिवाय ऐन दिवाळीच्या हंगामात पाऊस असल्यामुळे पणती विक्रीलाही त्याचा फटका बसला. मातीच्या वस्तू भाजण्यासाठी लागणारा पेंढा, लाकडे व कोळसा देखील भिजला आहे. त्यामुळे भट्टी लावणे अवघड झाले आहे. माती भिजल्याने ती पुन्हा वापरता येणार नाही. मालाला उठाव सुद्धा मिळत नाही. त्यात झालेले नुकसान यामुळे खूप वाताहत होत आहे.

**बांधकाम व्यवसायावर गदा**

जिल्ह्यात बांधकाम व्यवसाय व फार्म हाऊस व इतर विकसक व्यवसाय वाढत चालला आहे. नवनिर्माणाची कामे देखील काही प्रमाणात होतांना दिसत आहेत. मात्र स्लॅब टाकणे, वीट काम करणे, भराव किंवा उत्खनन करणे, रंगकाम करणे आदी कामांना परतीच्या पावसामुळे प्रचंड अडथळा येत आहे.

**विटभट्टी व्यवसाय संकटात**

वीट भट्टी व्यवसाय हा बांधकाम व्यवसायाचा कणा मानला जातो. त्यामुळे जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात वीटभट्टी व्यवसाय रुजला आणि वाढला आहे. दरवर्षी पावसाळा कमी झाल्यावर सर्वच वीटभट्ट्यांवर कामाची लगबग सुरू होते. मात्र यंदा पाऊस खूपच लांबला आहे. यामुळे वीटभट्टी व्यवसाय संकटात सापडला आहे. परतीच्या पावसामुळे मात्र या व्यवसायासाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी करणे अवघड झाले आहे.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मदन कृष्णा म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-वैजाळी, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १९३, एकूण क्षेत्र ०८-३५-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. ९.६३/- पैकी क्षेत्र ००-४२-५० (हे.आर.चौ.मी.)

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३०/१०/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मौजे, आवास, तालुका-अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. विनया सुजित पाटील रा. आवास ता. अलिबाग यांच्या खुद्द मालकी हक्काची मिळकत कायम स्वरुपी आमच्या अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे.**

| मौजे | नगर भूमापन क्रमांक. | क्षेत्र (चौ.मी) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| आवास ता.अलिबाग | ४२५ | २४३.७० | अ |

सदरची मिळकत विद्यमान मालकांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापांसून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख- २९/१०/२०२५

सही/-
**ॲड. मनोज परशुराम ओव्हाळ**
रजिस्टर ऑफिस समोर अलिबाग
गाळा नं.६ ता. अलिबाग जि. रायगड
मो. ९८८१२७७४४९

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the members of the public at large that on instructions of our clients, we are investigating the title of SAMEER AKA HARIBHAU GAJANAN KARVE AND MANJIRI MAHESH HASABANIS AKA RAJASHREE GAJANAN KARVE to the said Property more particularly described in the Schedule hereinbelow.

All persons having and/or claiming any right, title, interest, claim, demand or estate in, to, upon or in respect of the said Property, whether by way of sale, exchange, let, lease, tenancy, lis pendens, lien, mortgage, charge, maintenance, license, gift, inheritance, share, possession, easement, trust, bequest, agreement, assignment, insolvency, attachment, enforcement and/or through any other means of whatsoever nature or otherwise howsoever are hereby requested to intimate the undersigned in writing at the address mentioned below of any such said claims accompanied with all necessary and supporting documents within 7 (seven) days from the date of publication hereof, failing which it shall be presumed that there are no such said claims and/or that the said claims, if any, have for all intents and purposes been waived and/or abandoned.

**SCHEDULE OF THE SAID PROPERTY:**

All that undivided right, title and interest into and upon, all that piece and parcel of agricultural land and ground being a portion measuring 42.60 gunthas out of Survey No. 91, total admeasuring 3-29-30, situated lying and being at village-iradpada, Taluka Alibaug, District - Raigad, within the Registration and Sub Registration District of Alibaug which is bounded as follows, that is to say:

| VILLAGE | SURVEY NO | TOTAL AREA (H-ARES) |
|---|---|---|
| Ziradpada | 91 | 42.60 gunthas out of 3-29-30 |
| On or towards Eastern Side | | Private property belonging to Gut No. 82, 76,74,73 |
| On or towards Western Side | | Agricultural property owned by and in possession of Gut no. 91 owners |
| On or towards Southern Side | | Private property belonging to Gut no.73 |
| On or towards Northern Side | | Common access road for public use on the property owned by Gut No.91 owners |

referred to as the "said Property".
Dated this 00th day of Oct., 2025

Sd/-
Vashi And Vashi
Advocates and Solicitors
3, Wadia Building Floor 1, 17/19, Dalal Street, Fort,
Mumbai 400001. communicate@vashi.in

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चरी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमुद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-०६-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्रीमती मुमताजबीबी रझाक आवसेकर, राहणार श्रीगाव, पोयनाड,ता.अलिबाग,यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती मुमताजबीबी रझाक आवसेकर यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांच्या परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमुद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमुद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चरी, ता.अलिबाग | २८ | ०-८७-४०<br>०-०९-८० पो.ख.<br>०-९७-२० एकूण | १३-९४ |

सदरील मिळकतीपैकी श्रीमती मुमताजबीबी रझाक आवसेकर, यांच्या मालकीची ०-०६-०० (हे.आर), आकार रु.०.९६ पैसे, ही शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ३०-१०-२०२५

(सही/-)
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## ग्रुप ग्रामपंचायत साळवे
**ता.माणगाव, जि रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत साळवे खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/ पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव /वस्तूचे नाव | कामाचे परिमाण (संख्या) | निधीचा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा वेळ: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १%इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | ५००५७/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५००/- | १००/- |
| २. | बंधित प्लास्टिक कचरा साठवण युनिट | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | २७२९६/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | -- | १००/- |
| ३. | पाणोसे कोंड स्मशानभूमी पाणी सुविधा करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | ६८१०६/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६८१/- | १००/- |
| ४. | पाणोसे नळ पाणी पुरवठा टाकी दुरुस्ती साफसफाई रंगरंगोटी करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | ६८१०६/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६८१/- | १००/- |
| ५. | साळवे वरची आळी अंतर्गत उताराच्या रस्त्याला पायऱ्या बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | ८१७२७ /- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ८१७/- | १००/- |
| ६. | पाणोसे कोंड अंतर्गत रस्ता करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४-२५ ग्राप स्तर | ७४५१५/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७४५/- | १००/- |
| ७. | साळवे आदिवासी वाडी अंतर्गत रस्ता तयार करणे | १ | १५ टक्के मागासवर्गीय कल्याण निधी २५/२६ ग्राप स्तर | ८२६८८/- | ६ महिने | ६/११/२०२५ | सायं.५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ८२६/- | १००/- |

**अटी व शर्ती -**
१) प्राप्त निविदा दि. ०७/११/२०२५ रोजी स.ठीक ११.०० वाजता ग्रा.पं. साळवे येथे मा. प्रशासक यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२)कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. प्रशासक साळवे यांनी राखून ठेवला आहे. ३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे मा. प्रशासक । यांचे मार्गदर्शन व देखेरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.
६) १५ वा वित्त आयोग/ ग्राप स्तर निधी/ ग्रामपंचायत निधी उपलब्ध झाले नंतरच देयक अदा करण्यात येईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत साळवे**
**ता. माणगांव जि.रायगड**

सही/-
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत साळवे**
**ता. माणगांव जि.रायगड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| उमेश विश्वास जोशी वगैरे | २ | ३/ब | ०-३६-०० | १.४२ |
| | १५ | ५ | ०-७२-५० | ११.५० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ३०/१०/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता : कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे.या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारची हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-मौजे-तांबस, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) मोहम्मद साद मनोरिया उर्फ मोनारिया<br>२) मोहम्मद उमर मनोरिया उर्फ मोनारिया<br>३) मोहम्मद रजा मोहम्मद इरफान मनोरिया उर्फ मोनारिया | १७ | २ | ०-१०-२० | ० | १२ |
| मोहम्मद इरफान वली मोहम्मद मनोरिया उर्फ मोनारिया | ४७ | ३ | ०-०६-०० | ० | ०९ |
| | ४७ | ४ | ०-१३-०० | ० | १६ |
| | ४७ | १२ अ | ०-३१-०० | ० | ३१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :- ३०-१०-२०२५
मो.नं.८४४६८६९६७१
ईमेल :- nileshmundhe029@gmail.com

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड

ई निविदा सुचना सन २०२५-२६
म्यु.जा.क्र.१३१९/ ई-निविदा/मु.न.प.२०२५-२०२६

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा समुद्र किनारी सुशोभीकरण कामी बंधारा बांधणे, सुशोभीकरण वॉक वे, फूड जॉइंट्स करणे, वाहनतळ व अनुषंगिक सुविधा करणे. २. मुरुड नगरपरिषद हद्दीतील लक्ष्मीखार समाज मंदिर बांधणे व पायाभुत सुविधा करणे या कामांची ई निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी शर्ती :http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक. ३०/१०/२०२५ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ६/११/२०२५ आहे.

दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| अरविंद शिवराम जोशी वगैरे | १२ | ३/अ/१ | ०-३३-४० | ५.०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कर्जत
दिनांक : ३०/१०/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग, जि.रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल dd_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क.११/मा.अभि./जाहीर नोटीस/२१७२/सन २०२५ दिनांक : २८/१०/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार संस्था श्री स्वामी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पिंपळभाट चेंढरे, पो.ता.अलिबाग जि.रायगड यांनी दिपक सोमकांत पोतनिस, रा.ए.बी दुसरा मजला, श्री दत्त विहार सोसायटी, शिवाजीनगर, ठाणे, प्रभाकर नरहरी गोखले, रा.स्वामी समर्थ नगर, पिंपळभाट चेंढरे, अलिबाग यांचे विरूद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
श्री स्वामी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
मु.पिंपळभाट चेंढरे, पो.ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग-५०/२/ब/१२, क्षेत्र ३८४ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराचे जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यात येत असून त्यांनी वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ११/११/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांस हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/१०/२०२५

सही/-
**समक्ष प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

दिनांक : २९/१०/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे काविर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. विजयकुमार गजानन भगत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| काविर ता.अलिबाग | ५१२ | १-७३-३०<br>पो.ख.०-२२-००<br>एकुण क्षेत्र १-९५-३० | ४४.१९ |

वर नमुद मिळकतीपैकी श्री. विजयकुमार गजानन भगत यांच्या नावे खाते क्रमांक २७१ अन्वये असलेले क्षेत्र १-५८-३० हे. आर., पो.ख. ०-२२-०० हे. आर. एकुण क्षेत्र १-८०-३० हे. आर., आकार ४०.३७ रु. पैसे या मिळकतींपैकी ०-१५-०० हे. आर. इतक्या क्षेत्राबाबतचे

दिनांक : २९/१०/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.५१७/२०२५

उज्चला महादू खडतर - लग्नापूर्वीचे नाव
साक्षी श्रीराम जाईलकर-लग्नानंतरचे नाव — अर्जदार
वावे. पो. उणेगांवर माणगांव, रायगड.

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
सुरव तर्फे तळे ग्रामपंचायत सुरव तर्फे तळे
ता. माणगांव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

श्री/श्रीमती/सौ.साक्षी श्रीराम जाईलकर यांचा जन्म/मृत्यू मौजे राजिवली ता. माणगांव जि. रायगड याठिकाणी दि.११/०५/१९८२, रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. १२/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू राजिवली पो.बामणोली येथे दि.११/०५/१९८२ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. ११/०५/१९८२ रोजी राजिवली ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक :२९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. २२२/२०२५

निजाम अबुमिया गजगे
मु.पो. टेमपाले ता.माणगांव — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
टेमपाले, ग्रामपंचायत टेमपाले
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.फातीमा उस्मान गजगे यांचा जन्म/मृत्यू मौजे टेमपाले ता.माणगांव जि.रायगड या ठिकाणी दि.०७/०२/१९६५ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.२२/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू टेमपाले येथे दि.०७/०२/१९६५ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. ०७/०२/१९६५ रोज़ी टेमपाले ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) शिवदास तुकाराम म्हात्रे आणि २) हरिदास तुकाराम म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहकाची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-वैजाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १९३, एकूण क्षेत्र ०८-३५-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. ९.६३/- पैकी क्षेत्र ००-४४-१६ (हे.आर.चौ.मी.)

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३०/१०/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## निवडक

### ऑस्ट्रेलियन खेळाडूची मृत्यूशी झुंज

**सिडनी :** ऑस्ट्रेलियन क्रिकेट वतुर्ळात धक्का देणारी बातमी समोर आली आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी झुंज देत आहे. टी-२० सामन्यापूर्वी चेंडू खेळाडूच्या डोक्यावर आदळल्याने त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे आणि तो सध्या लाईफ सपोर्टवर आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मेलबर्नचा हा क्रिकेटपटू स्थानिक टी-२० सामन्यापूर्वी मेलबर्न साऊथइस्ट येथील वॉली ट्यू रिझर्व्ह इन फन्ट्री गल्ली येथे सायंकाळी पावणेपाच वाजता ही घटना घडली. फन्ट्री गल्ली आणि एल्डन पार्क यांच्यातल्या टी-२० सान्यासाठी युवा खेळाडू नेटमध्ये वॉर्म अप करत होता आणि तेव्हा त्याच्या डोक्यावर चेंडू जोरात आदळला. त्याला मोबाईल इंटेन्सिव्ह केअर रुग्णवाहिका आणि अ‍ॅडव्हान्स्ड लाईफ पॅरामेडिक्सने घटनास्थळी मुलावर प्राथमिक उपचार केले. त्यानंतर गंभीर अवस्थेत त्याला मोनाश मेडिकल सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. हा खेळाडू रुग्णालयात लाईफ सपोर्टवर असल्याची माहिती समोर येत आहे.

### बाबर आझम नावाचा फुसका बार

**नवी दिल्ली :** बाबर आझम ट्वेंटी-२० संघात परतला असून आता तो धावांचा पाऊस पाडून टीकाकारांची बोलती बंद करेल, अशी स्वप्न घेऊन मोठ्या संख्येने पाकिस्तानी चाहते स्टेडियमवर उपस्थित होते. परंतु, बाबरचा खराब फॉर्म कायम राहिला. १० महिन्यानंतर टी-२० संघात परतलेला बाबर दोन चेंडूंत शून्य धावेवर झेलबाद झाला. बाद होण्यापूर्वी तो धावचित होता होता वाचला, तर क्षेत्ररक्षणात त्याने झेलही टाकला. त्यामुळे पाकिस्तानी चाहते आणखी निराश झाले. त्यामुळे त्याच्यावर 'बाबर आझम नावाचा फुस्का बार', अशी टिका देखील होत आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात पाकिस्तानला ५५ धावांनी हार मानावी लागली होती. आफ्रिकेच्या दुसऱ्या फळीतील खेळाडूंकडून पाकिस्तानला हार पत्करावी लागल्याने चाहते आणखी संतापले होती. त्यावेळी आफ्रिकेने ९ बाद १९४ धावांचा डोंगर उभा केला आणि पाकिस्तानचा संपूर्ण संघ १८.१ षटकांत १३९ धावांत तंबूत परतला होता. तसेच, टी-२० क्रिकेटमध्ये बाबर आझम आठव्यांदा शून्यावर बाद झाला आणि त्याने पाकिस्तानकडून टी-२०त सर्वाधिक शून्यावर बाद होणाऱ्या खेळाडूंमध्ये शाहिद आफ्रिदीसह संयुक्तपणे तिसरे स्थान पटकावले आहे.

### आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ठाणेकर चमकले

**ठाणे :** दक्षिण आफ्रिकेतील केप टाऊन शहरात पार पडलेल्या जागतिक मास्टर्स क्लासिक व इक्विपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ठाण्यातील दत्तात्रेय उतेकर व विशाल उंबळकर यांनी चमकदार कामगिरी केली आहे. महाराष्ट्राच्या चमूने यातील इक्विपड स्पर्धा प्रकारात ३ सुवर्ण, २ रौप्य व ३ कास्यपदकांची, तर क्लासिक प्रकारात ३ कांस्यपदकांची कमाई केली आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील मास्टर्स खेळाडूंची निवड भारताच्या संघात झाली होती. ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा १२ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत पार पडली. या स्पर्धेसाठी जगभरातून ४०, ५०, ६० व ७० वर्षावरील कुरुष व महिला सहभागी झाल्या होत्या. त्यात ठाणे आनंद नगर येथील विशाल उंबळकर यांनी इक्विपड प्रकारात कांस्य, तर ढोकाळी येथील दत्तात्रेय उतेकर यांनी क्लासिक प्रकारात कांस्य व इक्विपड प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. खेळाडूंच्या या उत्पृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन मुंबई विभागाचे अध्यक्ष एदोदी भास्करन व सचिव संजय सरदेसाई यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### टेकबॉल खेळात ऐतिहासिक पाऊल

**मुंबई :** बहरीन येथे पार पडलेल्या एशियन युथ ऑलिम्पिक गेम्स २०२५ मध्ये टेकबॉल या उदयोन्मुख खेळ प्रकारात भारताचा संघ पहिल्यांदाच उतरला, ही इतिहासात नोंद होणारी घटना ठरली आहे. या ऐतिहासिक संघात मुंबईच्या अथर्व सकपाळने स्थान मळिवत अभिमानास्पद कामगिरी बजावली. अथर्वने पुरुष एकेरी प्रकारात नववा क्रमांक पटकावत भारताचा झेंडा उंचावला आहे. याआधी अथर्वने नाशिक येथे १३ ते १६ जून रम्यान झालेल्या



प्रथम युथ टेकबॉल नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये मेन सिंगल्स प्रकारात देशात प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर कोइंबतूर येथे आयोजित १२ दिवसीय सराव शिबिरात उत्पृष्ट कामगिरी करून त्याने एशियन युथ ऑलिम्पिकसाठी हिंदुस्थानी संघात स्थान निश्चित केले. अथर्वच्या या यशाबद्दल महाराष्ट्रभरातून कातुकाचा वर्षाव होत आहे. टेकबॉल हा अजून नव्याने उदयास येत असलेला खेळ असला तरी अथर्व आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे तो भारतात लोकप्रियतेच्या झोतात येत आहे. त्यांच्या या यशाने नव्या पिढीला प्रेरणा मिळत असून टेकबॉलच्या माध्यमातून भारतीय क्रीडा क्षेत्रात नवी दिशा मळिवेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# रो'हिट' शर्मा

■ वयाच्या ३८व्या वर्षी रचला इतिहास

■ एक दिवसीय क्रिकेटमध्ये अव्वल



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेच्या समाप्तीनंतर, आयसीसीने त्यांचे रँकिंग जाहीर केले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात शानदार शतक झळकावणारा भारतीचा माजी कर्णधार रोहित शर्माने रँकिंगमध्ये लक्षणीय झेप घेतली आहे. त्याने इतर सर्व फलंदाजांना मागे टाकत अव्वल स्थान गाठले आहे. त्यामुळे रोहित शर्मा क्रिकेट विश्वात 'हिट' ठरला आहे. त्याच्या या कामगिरीमुळे टिकाकारांची बोलती बंद झाली आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत महत्त्वपूर्ण बदल दिसून आले आहे. त्यात भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने अव्वल स्थान मिळवले आहे. यावेळी, त्याने दोन स्थानांनी झेप घेतली असून त्याचे रेटिंग ७८१ पर्यंत वाढले आहे. तसेच, रोहित शर्माने २०२७ च्या विश्वचषक स्पर्धेची तयारी किती जबरदस्त केली आहे, हे नुकत्याच पार पडलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून दिसली. सात महिन्यानंतर भारतीय संघाच्या जर्सीत परतलेल्या रोहितने त्या मालिकेत सर्वाधिक २०२ धावा करून मालिकावीर पुरस्कार जिंकला. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याच्या नाबाद १२१ धावांनी भारताने मालिकेचा शेवट गोड केला. रोहित शर्माने प्रथमच आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले असून कर्णधारपदावरून काढून टाकल्यानंतर आणि फलंदाज म्हणून मैदानात परतताच त्याने अर्धशतक आणि नंतर शतक ठोकले. त्यामुळे रोहित शर्माला अव्वल स्थान मिळवले आहे.

आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत रोहित शर्मानंतर अफगाणिस्तानचा इब्राहिम झद्रान दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. दरम्यान, शुबमन गिल आता दोन स्थानांनी घसरून तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. गिलचे रेटिंग सध्या ७४५ आहे. पाकिस्तानचा बाबर आझम ७३९ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडचा डॅरेल मिचेलनेही एका स्थानाने झेप घेतली आहे, तो आता ७३४ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे.

विराट कोहली एका स्थानाने घसरून ७२५ रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### पहिल्यांदाच ठरला नंबर वन

रोहित शर्माने जगातील नंबर वन एकदिवसीय फलंदाज बनून विश्वविक्रम रचला आहे. तो नंबर वन स्थान मिळवणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. रोहितने ३८ वर्षे आणि १८२ दिवसांच्या वयात एकदिवसीय सामन्यांमध्ये नंबर १ रँकिंग मिळवले आहे. रोहित शर्माच्या आधी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता. सचिन तेंडुलकर ३८ वर्षे आणि ८२ दिवस वय असताना जगातील नंबर वन एकदिवसीय फलंदाज ठरला होता. रोहितने १८ वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि आता तो पहिल्यांदाच नंबर वनवर पोहोचला आहे. रोहित हा एकदिवसीय क्रिकेटमध्ये नंबर वन रँकिंग मिळवणारा फक्त पाचवा भारतीय फलंदाज आहे. रोहितची एकदिवसीय कारकीर्द उल्लेखनीय आहे. त्याने आतापर्यंत २७६ एकदिवसीय सामन्यांमध्ये ११,३७० धावा केल्या आहेत.

## स्मृती मानधनाची विश्वविक्रमी रेटींग

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

भारतामध्ये सुरू असलेल्या एकदिवसीय विश्वकरंडकात न्यूझीलंडविरुद्धच्या लढतीत १०९ धावांची खेळी साकारणाऱ्या भारताच्या स्मृती मानधनाने आयसीसीच्या एकदिवसीय क्रिकेटमधील फलंदाजांच्या क्रमवारीत पहिले स्थान कायम राखले आहे. तसेच, तिने ८२८ रेटिंगची विक्रमी कमाईही केली आहे. ऑस्ट्रेलियाची अ‍ॅश्ले गार्डनर ७३१ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे.



भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये एकदिवसीय विश्वकरंडकाआधी एकदिवसीय सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत स्मृती मानधनाने धावांचा पाऊस पाडला. त्यामुळे सप्टेंबर महिन्यातील सर्वोत्तम महिला खेळाडू म्हणून तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच, आयसीसीच्या मासिक पुरस्काराची ती मानकरी ठरली. दक्षिण आफ्रिकेची लॉरा वॉलवॉर्ड्ट ही तिसऱ्या स्थानावर असून इंग्लंड संघाची कर्णधार नॅट सिव्हर ब्रंट ही चौथ्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलियाची बेथ मुनी हिने पाचवे स्थान पटकावले आहे. तसेच, स्मृती मानधनाव्यतिरिक्त भारताची एकही फलंदाज अव्वल दहामध्ये नाही. कर्णधार हरमनप्रीत कौर १८व्या, जेमिमा रॉड्रिग्ज १९व्या आणि दीप्ती शर्मा २४व्या स्थानावर आहे. भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा हिने गोलंदाजी व अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत पाचवे स्थान पटकावले आहे. दीप्ती शर्माव्यतिरिक्त भारताची एकही खेळाडू अव्वल दहामध्ये नाही. तसेच, आयसीसी महिलांच्या एकदिवसीय क्रमवारीत ऑस्ट्रेलियन संघ १६७ रेटिंगसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे. इंग्लंडचा संघ १२९ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर असून हरमनप्रीत कौरचा भारतीय संघ १२३ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे.



## भारत-ऑस्ट्रोलिया सामना रद्द

■ अर्धशतकी भागीदारीवर पावसाचे पाणी

**। कॅनबरा । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात टी-२० मालिकेतील पहिला सामना कॅनबरामधील मनुका ओव्हल स्टेडियमवर बुधवारी (दि.२९) खेळिवण्यात आला. यावेळी भारताच्या सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिलने आक्रमक फलंदाजी करत अर्धशतकी भागीदारी केली. भारताने ९.४ षटकात १ बाद ९७ धावा केल्या आणि त्यांच्या आक्रमक खेळीवर पावसाने पाणी फेरले. त्यामुळे हा सामना रद्द करण्यात आला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने सांगितले की, भारतीय संघाला प्रथम फलंदाजीच करायची होती. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताकडून डावाची सुरुवात अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल यांनी केली. अभिषेक नेहमीप्रमाणे त्याच्या शैलीत आक्रमक फलंदाजी करत होता. त्याने सुरुवातीपासूनच मोठे शॉट्स खेळले होते. परंतु, त्याला चौथ्या षटकात १९ धावांवर माघारी फिरावे लागले. त्यानंतर सूर्यकुमार यादव गिलला साथ देण्यासाठी आला. परंतु, ५ व्या षटकानंतर पावसामुळे पहिल्यांदा सामना थांबवण्यात आला. त्यानंतर साधारण पाऊण तासाने पुन्हा सामना सुरू झाल्यानंतर १८-१८ षटकांचा सामना करण्यात आला होता. त्यानंतर दोघंही आक्रमक खेळत होते. यादरम्यान सुर्यकूमारने आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये १५० षटकारही पूर्ण केले. गिल आणि सूर्यकुमार यांनी अर्धशतकी भागीदारीही केली होती. परंतु, १० व्या षटकादरम्यानही पुन्हा जोरात पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे पुन्हा सामना थांबवण्यात आला. अखेर बराच वेळ वाट पाहिल्यानंतर सामना सुरू होण्याच चिन्ह नसल्याने अखेर सामनाधिकाऱ्यांनी हा सामना रद्द केला.

### षटकार ठोकूनही फलंदाज बाद

**। कॅनबरा । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिज आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० मालिकेतील पहिला सामना २७ ऑक्टोबर रोजी खेळला गेला. त्यात वेस्ट इंडिजने बांगलादेशचा १६ धावांनी पराभव केला. बांगलादेशला शेवटच्या षटकामध्ये १६ धावांची गरज होती. १९ वे षटक टाकण्याची जबाबदीर वेस्ट इंडिजने रोमारियो शेफर्डच्या खांद्यावर सोपवली. या षटकातील चौथ्या चेंडूवर तस्कीन अहमदने खणखणीत षटकार ठोकला; मात्र, याच वेळी त्याचा पाय स्टंपला लागला आणि तो बाद झाला.

## मला खलनायक बनवलं आहे

■ मोहम्मद शमीचे धक्कादायक वक्तव्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघातून सध्या बाहेर असलेला अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने रणजी करंडक स्पर्धेत जबरदस्त कामगिरी करत पुन्हा संघात परत येण्याचा आपला दावा अधिक मजबूत केला आहे. शमीने दोन सामन्यांमध्ये एकूण १५ बळी घेत आपल्या फिटनेसचे आणि फॉर्मचे प्रत्यंतर दिले आहे. त्याचबरोबर त्याने निवड समितीला अप्रत्यक्षपणे उत्तरही दिले आहे.



कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर गुजरातविरुद्ध झालेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात शमीने एकूण ८ बळी घेत बंगालला विजय मळिवून देण्यात मोठी भूमिका बजावली. सामन्यानंतर त्याने भारतीय संघामध्ये स्वतःची निवड न झाल्याबद्दल सुरु असलेल्या वादावर मोठे वक्तव्य केले आहे. मंगळवारी गुजरातविरुद्धच्या दुसऱ्या डावात शमीने ३८ धावांत ५ बळी घेतले आणि आपल्या संघाला १४१ धावांनी मोठा विजय मळिवून दिला. सामन्यानंतर माध्यमांशी बोलताना जेव्हा त्याच्याकडे ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी त्याची निवड न केल्याबाबत आणि मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांच्या वक्तव्याबाबत विचारणा झाली, तेव्हा शमी म्हणाला की, मला आधीच माहिती होते की हा प्रश्न येणार. मी तर कायम कुठल्या ना कुठल्या वादात अडकलेलो असतोच. तुम्ही लोकांनी आधीच मला खलनायक बनवले आहे. आता मी आणखी काय बोलू? आजकाल सोशल मीडियावर प्रत्येक गोष्ट तोडून-मोडून दाखवली जाते. माझे काम म्हणजे चांगली कामगिरी करणे आणि भारतीय संघासाठी नेहमी तयार राहणे. मला जिथे संधी मळिेल, तिथे मी माझे सर्वोत्तम देईन. बाकी निर्णय निवडकर्त्यांचा आहे, असेही तो म्हणाला.

## लॉरा वोल्वाड्‌र्टचा विक्रम

**। गुवाहटी । वृत्तसंस्था ।**

महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या कर्णधार लॉरा वोल्वाड्‌र्टने वादळी शतक झळकावले. तिच्या १६९ धावांच्या विक्रमी खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडसमोर ३२० धावांचे आव्हान ठेवले. वोल्वाड्‌र्टने ही दीडशतकी खेळी करताना विश्वविक्रमासह काही मोठे विक्रम नावावर केले. हा पहिला उपांत्य सामना बुधवारी (दि.२९) बरसापारा क्रिकेट स्टेडियम-गुवाहाटी येथे इंग्लंड विरुद्ध खेळवला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वाड्‌र्टने वादळी शतक झळकावताना विश्वविक्रम नोंदलवला. वोल्वाड्‌र्टने १४३ चेंडूत २० चौकार आणि ४ षटकारांसह १६९ धावांची खेळी केली. त्यामुळे ही विक्रमी खेळी ठरली. तसेच ती महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या बादफेरीत शतक करणारी पहिलीच कर्णधार ठरली आहे. याशिवाय सर्वोच्च धावांची खेळी करणारी दक्षिण आफ्रिकेची खेळाडूही ती ठरली आहे. तिने मारिझान कापच्या विक्रमाला मागे टाकले आहे.

**दोन सामन्यांनंतर नऊ गुणांची कमाई** | **पृथ्वी शॉचे दमदार द्विशतक**

## महाराष्ट्राचा चंदिगडवर दणदणीत विजय

**। चंदिगड । वृत्तसंस्था।**

पहिल्या दिवसापासून वर्चस्व गाजविणाऱ्या महाराष्ट्राने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील इलिट 'ब' गटातील सामन्यात यजमान चंदिगडवर १४४ धावांनी दणदणीत विजय मळिवला आहे. पृथ्वी शॉचे दमदार द्विशतक, ऋतुराज गायकवाडचे शतक, विकी ओस्तवाल, मुकेश चौधरी व रामकृष्ण घोष यांची अफलातून गोलंदाजी ही महाराष्ट्राच्या विजयाची वैशिट्ये ठरली. या विजयामुळे महाराष्ट्राचे ९ गुण झाले आहेत.



रणजी करंडक २०२५-२६ स्पर्धेत महाराष्ट्र संघ सध्या चांगल्या लयीत खेळत आहे. दुसऱ्या फेरीत महाराष्ट्राने चंदिगढला १४४ धावांनी पराभूत केले आहे. त्यामुळे आता महाराष्ट्राला महत्त्वाचे ६ गुण मिळाले असून दोन सामन्यांनंतर अंकित बावणेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या महाराष्ट्र संघाचे ९ गुण झाले. महाराष्ट्राच्या चंदिगढविरुद्धच्या विजयात ऋतुराज गायकवाड, पृथ्वी शॉ, रामकृष्ण घोष आणि मुकेश चौधरी यांचे विशेष योगदान राहिले आहे. या सामन्यात शेवटच्या डावात महाराष्ट्राने चंदिगढला ४६४ धावांचे लक्ष्य दिले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना चंदिगढने चांगली लढत दिली होती. त्यातही अर्जुन आझादने दीडशतकी खेळी करत झुंज दिली; परंतु, चंदिगढचा संघ शेवटच्या दिवशी दुसऱ्या डावात ९४.१ षटकात ३१९ धावांवर सर्वबाद झाला.

तत्पुर्वी, या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना ८५.५ षटकात सर्वबाद ३१३ धावा केल्या होत्या. महाराष्ट्राकडून ऋतुराज गायकवाडने ११६ धावांची खेळी केली. तसेच, सौरभ नवलेने ६६ आणि अर्शिन कुलकर्णीने ५० धावांची खेळी केली. चंदिगढकडून जगजीत सिंग संधू आणि अभिषेक सैनी यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. त्यानंतर चंदिगढला पहिल्या डावात सर्वबाद २०९ धावाच करता आल्या. चंदिगढकडून रमण बिश्नोईने ५४ धावांची आणि निशुंक बिर्लाने नाबाद ५६ धावांची खेळी केली. महाराष्ट्राकडून विकी ओत्सवालने ६ बळी टिपले. त्यामुळे महाराष्ट्राला १०४ धावांची आघाडी मळािली होती. महाराष्ट्राच्या दुसऱ्या डावात पृथ्वी शॉने वादळी खेळी केली. त्याने १५६ चेंडूत द्विशतकी खेळी केली. त्याने २९ चौकार आणि ५ षटकारांसह २२२ धावांची खेळी केली. सिद्धेश वीरने ६२ धावांची खेळी केली. तर, ऋतुराज गायकवाडने नाबाद ३६ धावा केल्या आणि महाराष्ट्राने दुसरा डाव ३५९ धावांवर घोषित केला होता. त्यानंतर १०४ धावांच्या आघाडीसह महाराष्ट्राने ४६४ धावांचे लक्ष्य चंदिगढला दिले होते.

## शिरगावकरांवर गुन्हा दाखल



**। अहिल्यानगर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र ऑलिंपिक असो.चे महासचिव नामदेव शिरगावकर यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवरून अखेर पुण्यातील आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक मासाळ यांनी गुन्हा दाखल केला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने वारंवार हिशेब सादर करण्यास सांगितले होते; मात्र, त्यांनी ती मुदत संपल्यानंतरही हिशेब सादर केलेला नाही. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप उत्तमराव भोंडवे यांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक मासाळ यांच्याकडे नामदेव शिरगावकर यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यात महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन ही राज्यातील सर्व खेळांची प्रमुख संघटना असून, ती भारतीय ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न आहे. या संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी स्वतःचे नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तींना एकत्र करून अनेक खेळ संघटना स्थापन केल्या असून, त्या संघटनांमार्फत आर्थिक देवाणघेवाण केली जात असल्याचा आरोप आहे. शासनाकडून मळिणारा निधी अपहार करून स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्याची ही त्यांची पद्धत असल्याचे भोंडवे यांनी म्हटले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)